रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८८ ▌अंक २१२ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, सोमवार, दि. ३० डिसेंबर २०२४

किंमत ४ ₹

वाल्मिक कराडची खाती गोठवली

बीड : बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणी कारवाईला वेग आला आहे. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील चारही आरोपींची बँक खाती गोठवण्यात आली आहेत. यात वाल्मिक कराडच्या बँक खात्यांचाही समावेश आहे. खंडणी आणि हत्याप्रकरणी पोलिसांची पथके आरोपींच्या शोधासाठी रवाना झाली आहेत. वाल्मिक कराडच्या पत्नीचीही पोलिसांनी चौकशी करण्यात आली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींच्या पासपोर्टची माहितीसुद्धा मिळवण्यात आली आहे. संतोष देशमुख यांना चार वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन मारहाण करण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे.

प्राजक्ता माळींची आयोगात तक्रार

मुंबई : बीड भाजपचे आमदार सुरेश धस यांनी शुक्रवारी (दि.२७) परळीमध्ये 'इंव्हेट मॅनेजमेट पॉलिटिक्स चालते', असा आरोप केला होता. त्यांच्या या वक्तव्यावरून अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. यानंतर तिने पत्रकार परिषद घेत धस यांनी माफी मागावी, अशी मागणी केली होती. माध्यमांशी बोलताना धस यांनी प्राजक्ता माळी हिची मागणी धुडकावून लावली होती. दरम्यान, राज्य महिला आयोगाने 'या' प्रकरणाची दखल घेतल्याचे अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी रविवारी (दि.२९) सांगितले.

नवी मुंबई विमानतळावर उतरलं पहिलं विमान

पुढील वर्षी देशांतर्गत, आंतरराष्ट्रीय विमानांचे उड्डाण

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

नवी मुंबई विमानतळावर रविवारी (दि. २९) दुपारी पहिलं व्यावसायिक विमानाचे यशस्वीरित्या लँडिग झाले. इंडिगो-३२० विमान आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले. तर, पुढील वर्षात नवी मुंबईकरांना हक्काचं विमानतळ मिळणार आहे. १७ एप्रिल २०२५ मध्ये पहिले प्रवासी आणि कार्गो विमान सुरू होणार असल्याची माहिती विमानतळाचे सीईओ बी.व्ही. जेके शर्मा यांनी दिली.

> १७ एप्रिल २०२५ मध्ये पहिले प्रवासी आणि कार्गो विमान सुरू होईल. त्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू आहे. तसंच, सर्व परवानग्या मार्चपर्यंत मिळतील. १७ एप्रिल रोजी देशांतर्गत विमानसेवेचे उद्घाटन होईल, तर आंतरराष्ट्रीय विमानसेवेचे उद्घाटन होण्यास जून उजाडेल. - बी.व्ही. जेके शर्मा, सीईओ, नवी मुंबई विमानतळ

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी पहिल्या व्यावसायिक विमानाचे लँडिंग झाले आहे. दुपारी दीडच्या सुमारास इंडिगो एअरलाईनचे व्यावसायिक विमान नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या रनवेवर लँडिंग केले आहे. ●> पान २ वर

वॉटर सलामी, टाळ्या अन् जल्लोष

नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहिल्या विमानाचे लँडींग झाले. यावेळी विमानतळावरील कर्मचाऱ्यांनी टाळ्या वाजवून आणि जल्लोष करत आनंद व्यक्त केला. तर, अग्निशमन दलाकडून पहिल्या विमानास वॉटर सलामीही देण्यात आली. महिनाभरापूर्वी वायुदलाच्या सी २९५ आणि सुखोई ३० या विमानांचे येथे लँडींग झाले होते, या विमानांचे लँडींग यशस्वी झाल्यानंतर पहिल्यांदाच व्यावसायिक विमानाचं लँडिंग करण्यात आलं आहे.

मुंबई विमानतळावरील भार कमी होणार

नवी मुंबई विमानतळामुळे मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील भार कमी होणार आहे. नवी मुंबईत हे विमानतळ मुंबईपासून ४० कि.मी. अंतरावर असणाऱ्या पनवेलजवळ बांधण्यात आलं आहे. १,१६० हेक्टर परिसरात विमानतळ बांधण्यात आलं आहे. नवी मुंबई विमानतळ जगातील प्रमुख शहरांशी जोडले जाणार आहे. तसंच, नवी मुंबईच्या विमानतळाला मेट्रो, लोकल, बस आणि खासगी वाहनांसोबत जोडण्यात येईल. तसंच, मुंबईवरुन नवी मुंबई विमानतळ गाठण्यासाठी वॉटर टॅक्सीचा विचारही करण्यात येत आहे.

वे|ध|क

नाना पटोले यांना मातृशोक

मुंबई : महाराष्ट्र काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या आई मीराबाई फाल्गुनराव पटोले यांचे रविवारी (दि. २९) पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ९0 वर्षांच्या होत्या. मीराबाई पटोले यांच्या पार्थिवावर दुपारी २ वाजता भंडारा जिल्ह्यातील सुकळी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. राज्यातील विविध राजकीय नेत्यांनी मीराबाई पटोले यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले आहे. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी पटोले कुटुंबियांप्रती संवेदना व्यक्त केल्या आहेत.

एमआयडीसीत भीषण अग्नितांडव

पालघर : आशिया खंडातील सर्वात मोठ्या औद्योगिक क्षेत्रापैकी एक असलेल्या बोईसर तारापूर एमआयडीसीत भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. बोईसर तारापूर औद्योगिक कार्यक्षेत्रातील प्लॉट नंबर के-६ मधील युके रोमॅटिक अँड केमिकल्स या कारखान्याला भीषण आग लागली आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. सुट्टीचा दिवस असल्याने मोठा अनर्थ टळला.

माजी खा. सतीश प्रधान यांचे निधन

ठाणे : महानगरपालिकेचे शिवसेनेचे प्रथम महापौर माजी खासदार सतीश प्रधान (८४) यांचे रविवारी दुपारी दोन वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. सतीश प्रधान यांनी ठाणे शहराच्या विकासामध्ये तसेच शिवसेनेच्या संघटनात्मक मजबुतीसाठी मोठे योगदान दिले. त्यांची अंत्ययात्रा सोमवारी सकाळी दहा वाजता त्यांच्या निवासस्थानावरून निघणार आहे. सतीश प्रधान यांचा जन्म २९ ऑगस्ट १९४0 रोजी झाला होता. ते ठाणे शहराचे पहिले महापौर होते. ते शिवसेनेचे होते आणि राज्यसभेतील शिवसेना पक्षाचे नेते होते.

कार्बनचे प्रदूषण जीवघेणे; धूर सोडणाऱ्या कंपन्यांमुळे वयाळकरांचा

जीव गुदमरतोय

> गावामध्ये मोठ्या प्रमाणात कार्बनचे प्रमाण वाढले आहे. ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले असून, अनेकजण बाधित झालेत. ग्रामस्थांना कॅन्सरसारखे मोठे आजार जडण्याची भीती आहे. घरापासून ते घराबाहेरसुद्धा सर्वत्र कार्बनचे काळे पसरलेले दिसून येते. दिवसापेक्षा रात्री मोठ्या प्रमाणात कंपनीतून धूर सोडण्यात येतो. हे कुठेतरी थांबवणे गरजेचे असून, ही कंपनीचा निषेध करते.
> - स्नेहा म्हात्रे, वयाळ ग्रामस्थ

> कंपनीच्या चिमणीतून कार्बनयुक्त धूर जात नसून, ग्रामस्थांनी पाठविलेले व्हिडीओ हे जुने आहेत.
> - कंपनी अधिकारी

। रसायनी । राकेश खराडे ।

रसायनी पाताळगंगा येथील इसांबे ग्रामपंचायत हद्दीत येणारी रॉयल कार्बन ब्लॅक व फिंस्टर ब्लॅक प्रा.लि.विरोधात ग्रामस्थ मंडळ वयाळकरांनी जीवघेण्या कार्बनच्या प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांविरोधात गावबैठक घेत आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. या कंपन्यांमुळे आम्हा ग्रामस्थांचा आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून, यामुळे ग्रामस्थांत आजार बळावल्याचे स्थानिकांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

गावातील कार्बनच्या प्रदूषणामुळे अनेक महिने स्थानिक नागरिक त्रस्त असून, वेगवेगळ्या आरोग्याच्या असंख्य तक्रारी समोर येत असल्याने संतप्त ग्रामस्थांनी वयाळ गावातील मंदिरात गावबैठक आयोजित केली होती. यानंतर पत्रकार परिषदेत आपले मत व्यक्त केले.

दरम्यान, कंपन्यांच्या चिमणीमधून हवेत मिसळलेले कार्बन मोठ्या प्रमाणात गावामध्ये पसरत असल्याने प्रदूषणाचा फटका वयाळसमवेत वानिवली, लोहोप, वाशिवली, टेंभरी व टेंभरीवाडी या गावांमधील लोकसंख्या जवळपास १७ ते १८ हजार असून, सर्व ग्रामस्थ प्रदूषणामुळे बाधित आहेत. अनेक वेळा तक्रारी करूनसुद्धा कंपन्यांकडून काहीही बदल न झाल्याने प्रदूषणावर कायमस्वरूपी उपाययोजना व्हावी अन्यथा अशा ●> पान २ वर

आरोग्य धोक्यात

या प्रदूषणामुळे श्वसनाचा त्रास मोठ्या प्रमाणात होत आहे. श्वास गुदमरणे, कोंढणे, खोकला उटणे तसेच अस्वस्थता जाणवणे, अशा एक ना अनेक आजाराने नागरिक मोठ्या प्रमाणात त्रस्त आहेत. भविष्यामध्ये कॅन्सर, श्वासाचे, फुफ्फुसाचे आजारदेखील होण्याची शक्यता असल्याने स्थानिकांनी जगायचे कसे, असा प्रश्न निर्माण होत आहे.

शेती काळवंडतेय

गावातील शेतकरी त्यांचे पीक, पाणी, फळझाडे यांस गेली पाच ते सहा वर्षे मोहोराची लागण होत नाही, तसेच भाजीपाल्यावर गंभीर परिणाम होत आहे. अनेक वेळा तक्रारी व अर्ज सूचना करूनसुद्धा कंपन्यांनी आपली बेजबाबदार प्रक्रिया तशीच चालू ठेवत असल्याचे पहावयास मिळते. या दोन्ही कंपन्यांवर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नसल्याने अशा धोकादायक कारखान्यांविरोधात स्थानिक नागरिक आंदोलन व उपोषणाच्या तयारीत असून, कंपनी हद्दपार करा, अशी मागणी जोर धरत आहे.

सात वर्षीय मुलीवर अत्याचार

- कोर्लईतील घटनेने उडाली खळबळ
- आरोपीविरोधात गुन्हा दाखल

। रेवदंडा । वार्ताहर ।

मुरूड तालुक्यातील कोर्लई येथे अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. रेवदंडा पोलीस ठाण्यात पीडितेच्या पालकांनी नोंदविलेल्या तक्रारीनुसार आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोर्लई समुद्रकिनारी लावण्यात आलेल्या मच्छिमार बोटीमध्ये शुक्रवारी (दि. २७) दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास कोर्लई येथील बावीस वर्षीय आर्यन दिपक कोटकर याने पीडितेवर अत्याचार केला. कोर्लई कोळीवाड्यातील सात वर्षीय पीडित अल्पवयीन मुलगी लहान भाऊ व बहिणीला सोबत घेऊन समुद्रकिनारी शौचालयास आली होती. सदर अल्पवयीन पीडिता अल्पवयीन असल्याचे माहीत असूनसुद्धा तिच्या अज्ञातपणाचा फायदा घेऊन तिला एकटीलाच समुद्रकिनारी उभ्या असलेल्या मच्छिमार बोटीत नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार करून गंभीर दुखापत केली. याबाबत पीडित मुलीच्या आईने अल्पवयीन मुलीस विश्वासात घेतले असता तिने घडलेला प्रकार सांगितला. याबाबतची तक्रार पीडितेच्या आईने रेवदंडा पोलीस ठाणे नोंदविली आहे. ●> पान २ वर

महिलेच्या खूनप्रकरणी पतीसोबत पत्नी, मुलीला अटक

पनवेल : वलप येथील संगीता आगवणे या महिलेची हत्या आणि दागिने चोरी केल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपी शरद साहू याला अटक केली होती. तिच्याकडील दागिन्यांची विक्री केल्याप्रकरणी पोलिसांनी आरोपीची पत्नी मंजुळा शरद साहू (३९) आणि मुलगी सोनिया राहुल साकेत (२०) या दोघींना अटक केली. या दोघींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली.

संगीता आगवणे या महिलेच्या हत्येप्रकरणी तब्बल दीड महिन्यांनंतर गुन्हे शाखा कक्ष दोन यांनी हत्येतील आरोपी शरद साहू याला अटक केली. आरोपीने महिलेची हत्या करून दागिने आणि मोबाईल घेऊन पोबारा केला होता. त्यानंतर शरद साहू याने मयत महिलेचे दागिने विकण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, ज्वेलर्सने त्याच्याकडून दागिने घेतले नाहीत. त्यानंतर ते दागिने त्याने पत्नीला आणि मुलीला दिले. त्यातील ●> पान २ वर

सुपारी, मिरी चोरीप्रकरणी एकाला अटक

। नवीन पनवेल । वार्ताहर ।

पाच कोटी रुपयांच्या सुपारी आणि मिरी चोरीप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी एकाला भिवंडी येथून ताब्यात घेतले. त्याला न्यायालयात हजर केले असता ३0 डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. कुणाल रमेश भानुशाली (मुंबई-कांदिवली) असे त्याचे नाव आहे.

२३ डिसेंबर रोजी रात्रीच्या सुमारास शिरढोण येथील गाळ्यात कस्टम विभागाकडून कस्टम ड्युटी न भरलेला तीन कंपन्यांचा सुपारी व मिरी हा माल सुरक्षा रक्षक याला चाकूचा धाक दाखवून आणि त्याला बांधून चोरून नेला होता. त्यानंतर सुरक्षारक्षकाचा मोबाईल घेऊन ते पळून गेले. पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तांत्रिक तपासाद्वारे भिवंडी येथून कुणाल भानुशाली याला मुद्देमालासह ताब्यात घेतले. यातील मुख्य सूत्रधार अद्याप फरार आहेत. पुढील तपास पोलीस करत आहेत.

निवृत्त तहसीलदार आनंद नारे यांचे निधन

। अलिबाग । वार्ताहर ।



रायगड जिल्हाधिकार कार्यालयातील सेवानिवृत्त तहसीलदार आनंद पांडुरंग नारे यांचे शनिवारी (दि.२८) रात्री निधन झाले. जिल्हाधिकारी कार्यालयात ते अनेक वर्षे विविध जिल्हाधिकाऱ्यांचे स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत होते. यामुळे त्यांचा संपूर्ण जिल्ह्यात सुपरिचय झाला होता. त्यानंतर त्यांनी पनवेल, खालापूर आदी ठिकाणी तहसीलदार म्हणून काम पाहिले. अखेरच्या टप्प्यात जिल्हाधिकारी कार्यालयात ते महसूल विभागाचे चिटणीस म्हणून सेवानिवृत्त झाले. अत्यंत सुस्वभावी, हसतमुख अशी त्यांची ख्याती होती. यामुळे ते अधिकारी, कर्मचारी वर्गातही लोकप्रिय होते. शनिवारी त्यांची प्राणज्योत मालविली. रविवारी (दि. २९) त्यांच्या पार्थिवावर श्रीबाग स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा, मुलगी, सून, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अंत्ययात्रेस अलिबागमधील विविध क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते.

खा. तटकरेंची पेणकरांना सापत्न वागणूक

- आश्वासनांचा विसर पडल्याने नाराजी
- लांब पल्ल्याच्या गाड्यांना रोहा स्थानकात थांबा

। पेण । प्रतिनिधी ।

गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत खा. सुनील तटकरे यांनी पेण तालुक्यात झालेल्या जाहीर सभांमध्ये पेणला लांब पल्ल्याच्या रेल्वे गाड्या थांबवण्यासाठी प्राथमिकता देऊन प्रयत्न केले जातील, असे आश्वासन दिले. परंतु, जेव्हा लांब पल्ल्याच्या गाड्या थांबवण्याची वेळ आली, तेव्हा खा. तटकरे यांनी पेणकरांना सावत्र वागणूक देत लांब पल्ल्याच्या गाड्या रोहा रेल्वे स्थानकावर थांबविण्यासाठी प्राधान्य दिले. खा. तटकरेंना आश्वासनांचा विसर पडल्याने पेणकरांमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण आणि गणपतीबाप्पा निर्मितीचे केंद्र म्हणून पेण शहराची जगाच्या पाठीवर ओळख आहे. गेली कित्येक वर्षे पेणकर संघर्ष करत आहेत की, पेणला लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा मिळावा. परंतु, ●> पान २ वर

- यापुढे लोकमान्य टिळक मडगाव एक्स्प्रेस, कोचुवेली चंदीगड केरळा संपर्क क्रांती एक्स्प्रेस, कोचुवेली-इंदूर एक्स्प्रेस, हिसार-कोयंबतूर एसी एक्स्प्रेस आणि दादर-तिरुनेलवेली एक्स्प्रेस या रेल्वे गाड्या रोहा रेल्वे स्थानकात थांबणार आहेत.
- मताधिक्य पेणकरांनी द्यायचे आणि सोयीसुविधा रोहेकरांना द्यायच्या, ही बाब पेणकरांना न पटल्यामुळे पेणकरांच्या मनात खा. सुनील तटकरे यांच्याविषयी नाराजी निर्माण झाली आहे.

मुंबईच्या खोल समुद्रात मासेमारी बोटीला अपघात

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबईच्या गेट वे ऑफ इंडियाकडून एलिफंटाकडे जाणाऱ्या एका प्रवासी बोटीचा भीषण अपघात झाला होता. भारतीय नौदलच्या वेगवान स्पीड बोटीने जोरदार धडक दिल्याने ही बोट उलटली. या दुर्घटनेत १३ जणांचा मृत्यू झाला. त्यात नौदलाच्या तीन कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. या दुर्घटनेतून अद्याप मुंबईत सावरलेली नाही. त्यातच आता मुंबईच्या मढ समुद्रकिनारी एक मासेमारी करणारी बोट बुडाल्याची घटना शनिवारी (दि. २९) मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास घडली आहे.

मालाडमधील मढ परिसरातील हेमदीप हरिश्चंद्र टिपरी हे नेहमीप्रमाणे मढ कोळीवाडा या ठिकाणी मासेमारी करण्यासाठी गेले होते. त्याचदरम्यान चायनाच्या एका मालवाहू जहाजाने त्यांच्या मासेमारी करणाऱ्या नौकेला धडक दिली. त्यामुळे ही नौका बुडाली. या नौकेवर असणारे तांडेल/खलाशी यांना बाजूला असलेल्या सवटी ग्रुपच्या ●> पान २ वर

मालवाहू जहाजाने टक्कर मारल्याने मोठे नुकसान

इतिहास संशोधक राज मेमाणे यांचा संशोधनातून दावा

रायगडावरील जगदीश्वर अन् वाडेश्वराचे मंदिर वेगवेगळे

। मुंबई । प्रतिनिधी ।

रायगडावर असलेल्या महादेव मंदिरांचा अभ्यास करताना दोन स्वतंत्र मंदिरांचा पुरावा समोर आला आहे. इतिहास संशोधक राज मेमाणे यांच्या संशोधनातून श्री जगदीश्वर आणि श्री वाडेश्वर महादेव ही दोन्ही मंदिरं वेगवेगळी असल्याचे समोर आले आहे. भारत इतिहास संशोधक मंडळात झालेल्या पाक्षिक सभेत राम मेमाणे यांनी त्यांचे संशोधन सादर केले. यावेळी ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ पांडूरंग बलकवडे, मंडळाचे अध्यक्ष प्रदीप रावत, उपाध्यक्ष डॉ. बी.डी. कुलकर्णी, कोषाध्यक्ष नंदकुमार निकम यावेळी उपस्थित होते.

राज मेमाणे म्हणाले, "रायगडावरील महादेवाचे मंदिर त्याच्या तटबंदीवर असलेल्या शिलालेखातील मजकुरावरून श्री जगदीश्वर महादेव या नावाने ओळखले जाते. पुणे पुरालेखागारातील पेशवेकालीन मोडी कागदपत्रांतून रायगडावर श्री वाडेश्वर महादेवाचे जीर्ण झालेले मंदिर होते आणि त्याचा जीर्णोद्धार इसवी सन १७८२ साली केला, असा उल्लेख येतो." पुढे ते म्हणाले, "त्यावरून ज्येष्ठ इतिहास संशोधक श.ना. जोशी यांनी त्यावेळेस उपलब्ध झालेल्या कागदपत्रांतील मजकुरावरून असा तर्क मांडला होता की, रायगडावरील महादेवाचे शिवकालीन मूळ नाव वाडेश्वर असावे आणि प्रस्तुत शिलालेखात गौरवार्थ म्हणून काव्यात त्याला जगदीश्वर म्हटले गेले असावे. परंतु, पुणे पुरालेखागारातील रायगडच्याच मोडी कागदपत्रांतून वाडेश्वर महादेव मंदिराच्या जीर्णोद्धार केलेल्या बांधकामाचा इसवी सन १७८२ सालातील मूळ, अस्सल, अप्रकाशित आणि बांधकामाचा विस्तृत तपशील सांगणारा एकूण ११ मोडी कागदपत्रांचा संच सापडला असून, त्यात श्री वाडेश्वर महादेवाचे जीर्ण झालेले मंदिर कुशावर्त तळ्यावर होते, असा स्पष्ट उल्लेख येतो."

या संचातील कागदाचे शीर्षक असे की, देऊळ श्री वाडेश्वर महादेव कुशावर्त तळ्यावरील जुनी जीवरखी (गाभारा) होती. लागवड खर्च करून देवाची स्थापना केली. त्यास देऊळ बांधावयास खर्च जाहला तो नख्त रुये ९९ रुपये ४ आणे तीन पैसे. याशिवाय मंदिराच्या बांधकामासाठी वापरलेले साहित्य, बांधकाम करणाऱ्या लोकांची नावे, त्यांचे कामाचे दिवस, इत्यादी बारीक सारीक तपशील पाहायला मिळतो. या संशोधनामुळे रायगडावरील जगदीश्वर महादेव हेच श्री वाडेश्वर महादेव नसून, ही दोन वेगळी मंदिरे असून, वाडेश्वर महादेवाची कुशावर्त तळ्यावरील स्थान निश्चिती करता येते", अशी माहिती राज मेमाणे यांनी दिली. संशोधन सादर करण्यासाठी मंदार लवाटे, शिवराम कार्लेकर, विशाल खुळे व कौस्तुभ कस्तुरे, प्रसाद दांगट यांनी सहकार्य केले.



अमित शाहांनी देशाची माफी मागावी

परळीत भीम अनुयायांची आक्रोश मोर्चाद्वारे मागणी

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणारे जे वक्तव्य केले आहे त्याचा जाहीर निषेध, तसेच परभणी जिल्ह्यात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधान शिल्पाची विटंबना करणाऱ्या दोषींना त्वरित ताब्यात घ्यावे. सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूस जबाबदार पोलीस कर्मचारी, अधिकायांवर कठोर कारवाई करावी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान करणारे वक्तव्य करणाऱ्या गृहमंत्री अमित शाह यांनी संपूर्ण देशवासियांची त्वरित माफी मागावी, अशी जोरदार मागणी करीत सुधागड परळी येथील भीम अनुयायी, बहुजन समाज बांधवांनी रविवारी दि.(२९) रोजी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा विजय असो, छ. शिवाजी महाराज की जय, भारतीय संविधानचा विजय असो व अमित शाह यांच्या निषेधाच्या घोषणा देण्यात आल्या.

संपूर्ण देशात ठिकठिकाणी आंबेडकरी अनुयायी रस्त्यावर उतरून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या निंदनीय वक्तव्याचा तीव्र निषेध करीत आहेत. देशाला स्वातंत्र्य होऊन जवळ जवळ ७७ वर्षे झाली. समता, स्वातंत्र्य आणि बंधुता या तीन सूत्रांवर आधारलेली आपली स्वतंत्र भारताची लोकशाही जगात सर्वश्रेष्ठ मानली जाते. गेल्या महिन्यातच आपण ७४ वा 'संविधान दिन' साजरा केला. पण, हा संविधान दिन साजरा होत असताना, अनेकांच्या पोटात दुखू लागले. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखणीतून अवतरलेल्या भारताच्या राज्यघटनेने इथल्या प्रत्येक नागरिकाला एक भारतीय म्हणून ओळख तर दिलीच; पण त्याचबरोबर स्त्री, वंचित, शोषित वर्गाला समानतेचा अधिकार दिला. याच संविधानाच्या ताकदीने आज सर्वसामान्य व्यक्ती मोठमोठ्या पदावर विराजमान झाली आहे. अमित शाह यांनी ज्याप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबद्दल वादग्रस्त विधान केले, तसे विधान यापुढे कोणीही करण्याआधी शंभर वेळा तरी विचार करावा. अन्यथा त्याचा परिणाम काय होईल, याची दखल घ्यावी, असा इशारा यावेळी उपस्थित भीम अनुयायांनी दिला. तर अमित शहा यांनी संपूर्ण देशाची त्वरित माफी मागावी तसेच परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी या बांधवांची पोलीस कोठडीमध्ये हत्या झाली, त्यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी यावेळी उपस्थित परळी विभागातील भीम अनुयायी व बहुजन समाज बांधवांनी केली.

आज सुधागड तालुका बौद्ध समाजाच्या वतीने निषेध रॅली आयोजित करण्यात आली होती. यावेळी दिलीप जाधव, चंद्रकांत साळुंखे, अशोक वाघमारे, किरण गायकवाड, दीपक पवार, अमित गायकवाड, अशोक कांबळे, रमेश साळुंखे, राहुल गायकवाड, ज्ञानेश्वर गायकवाड, संजय गायकवाड, नारायण जाधव, राजेश गायकवाड, कृष्णा गायकवाड, रुपेश साळुंखे, मारुती साळुंखे, भगवान वाघमारे, भागवत गायकवाड, मनोज मोरे, रोहिणी जाधव, नंदिनी मोरे आदींसह अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दप्तरमुक्त शनिवार, वडगाव शाळेचा उपक्रम

बाल वैज्ञानिक तयार करण्याचा संकल्प

। रसायनी । वार्ताहर ।

वडगाव शाळेत अवतरले बालवैज्ञानिक त्यांनी बनविल्या ब्रेन कॅप, शनिवार दप्तर मुक्त करून घेतला बाल वैज्ञानिक बनण्याचा संकल्प. वडगाव शाळेची तालुक्यात वाह वाह.

रायगड जिल्हा परिषदेची ग्रामीण उत्कृष्ट शाळा, वडगाव या शाळेतील शिक्षक सुभाष राठोड यांनी अगस्त्या फाऊंडेशनने घेतलेल्या विज्ञान विषयाच्या प्रशिक्षणानंतर आज शाळेत दप्तरमुक्त शनिवारसाठी ब्रेन कॅप बनविण्याचा उपक्रम घेतला. यावेळी मुलांनी व सर्व शिक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. चौथी ते आठवीच्या मुलांनी कृतीयुक्त पद्धतीने तयार केलेल्या ब्रेन कॅप आज गावातील लोकांसाठी वेगळेच आकर्षण होते. सर्व मुले व शिक्षक डोक्यावर कॅप घेऊन शाळेतून निघाले, या उपक्रमाचे पालक व ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

वडगाव शाळा नेहमीच छान उपक्रम शोधून काढत असतात, त्यामुळे शाळेचे शैक्षणिक आकर्षण कायम राहते. शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा करुणा ठोंबरे यांनी सिप्ला कंपनी व अगस्त्या फाऊंडेशनकडून प्रशिक्षण घेतले, त्याचा मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी फायदा होत आहे, छोटे-छोटे प्रयोग मुले आनंदाने करत आहेत. मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद माझ्यासाठी महत्त्वाचा आहे, असे मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी सांगितले.

विज्ञान प्रदर्शनात एम.बी.पाटील स्कूलचे यश

। खांब । वार्ताहर ।

सुतारवाडी येथे दि.२७ डिसेंबर रोजी संपन्न झालेल्या रोहा तालुका विज्ञान प्रदर्शनात एम.बी.पाटील स्कूल वरसे या स्कूलने प्रथम क्रमांक संपादित करून यश मिळविले आहे.

तालुका विज्ञान प्रदर्शनात या स्कूलच्या पुष्कर टिळक, दिग्विजय लांडे, प्रथमेश गोसावी, प्रतिक जगताप, यशस्वी डाके यांनी तयार केलेल्या वैज्ञानिक प्रतिकृतीस प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. या विद्यार्थ्यांना येथील शिक्षिका रूकसाना सय्यद यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन लाभले. तर विद्यार्थीवर्गाने मिळविलेल्या यशाबद्दल सर्व संस्थाचालक, मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकां अभिनंदन केले.

कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी चारशे डस्टबिनचे वाटप

। चणेरा । प्रतिनिधी ।

गावांमध्ये, घरांमध्ये आणि सार्वजनिक ठिकाणी निर्माण होणारा कचरा टाकण्यासाठी डस्टबिनचा वापर व्हावा, डस्टबिनमुळे दूषित आणि कुजलेला कचरा एकाच ठिकाणी साठवता येतो आणि तो आसपासच्या वातावरणापासून दूर नेता येतो. तर, कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी डस्टबिनचा फायदा होतो. या बाबी लक्षात घेऊन १५ व्या वित्त आयोगातून ४०० घरगुती डस्टबिनचे वाटप ग्रामपंचायत आरेबुद्रुक अंतर्गत येणाऱ्या आरेबुद्रुक, आरेखुर्द आणि कुंभोशी या गावांमध्ये करण्यात आले.यावेळी सरपंच राजेंद्र मळेकर, ग्रामसेविका प्रिया कुंडे, सदस्या अनिता चोंडे, सदस्य चेतन शिंदे, प्रशांत शिंदे, सुहास शिंदे, दगडू शिंदे, संकेत घाग, नरेश चोंदे, पुंडलिक घाग, परशुराम म्हात्रे यांच्यासह ग्रामस्थ व महिला उपस्थित होत्या.

गृहनिर्माण योजनेपासून पोलीस बांधव वंचित

सुभाष म्हात्रे यांचे सिडकोला पत्र

। नवी मुंबई । प्रतिनिधी ।

सिडकोकडून गृहनिर्माण योजना राबविली जात आहे. मात्र, यात पोलीस बांधवांना मात्र घरे राखीव ठवेलेली नाहीत. शासनाकडे समाजागिक घरे राखीव ठेवण्याची अनेकदा मागणी केली जाते. मतांचे गणित पाहता अनेकदा राजकारण्यांकडून या मागण्या मान्य केल्या जातात. मात्र, या सर्वात नागरिकांच्या रक्षणार्थ राबणारा पोलीस वर्ग मात्र वंचित असतो. हीच बाब लक्षात घेत सानपाडा येथील सामाजिक कार्यकर्ते सुभाष म्हात्रे यांनी सिडको एमडी विजय सिंघल यांना पत्र देत पोलिसांसाठी किमान ५ टक्के घरे राखीव ठेवावीत, अशी मागणी केली आहे.

पोलीस बांधव ऊन पावसाची तमा न बाळगता सदैव समाजाचे रक्षण करत असतात. त्यामुळेच आपण आपले सण, उत्सव निर्भयपणे साजरे करत असतो. याशिवाय शासनावर जेव्हा मोर्चे नेले जातात, तेव्हा शासकीय अधिकाऱ्यांना सुरक्षा कवच म्हणून पोलीस बांधवच पुढे येत असतात. पोलिसांना राहण्यासाठी अनेक ठिकाणी पोलीस लाईन कॉलनी आहेत, पण त्यांची दुरवस्था झालेली आहे. अशा दुरवस्था झालेल्या घरांमध्ये पोलीस कुटुंबीय राहात आहेत. निवृतीनंतर पोलिसांना ही घरे सोडून जावी लागतात. अनेक पोलिसांना त्यांची स्वतःची घरे नसल्याने निवृत्तीनंतर भाड्याच्या घरात आयुष्यभर राहावे लागते. अशी अनेक उदाहरणे दिसून येतात.

सिडकोतर्फे नवी मुंबईत विविध ठिकाणी २६ हजार घरांची गृहनिर्माण योजना २०२४ आणण्यात आली आहे. मात्र, दुर्दैवाने यात पोलीस बांधवांचा विचार केला गेलेला नाही. मागील काळात तत्कालिन पोलीस आयुक्त गुलाबराव पोळ यांनी तत्कालिन सिडको व्यवस्थापकीय संचालक गिल यांना विनंती करून उलवे येथील उन्नती गृहनिर्माण योजनेत पोलिसांसाठी ५ टक्के घरे राखीव ठेवण्याची विनंती केली होती. तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांनी ती विनंती मान्य केल्यामुळे उलवे,उन्नती गृहनिर्माण योजनेमध्ये अनेक पोलिसांना स्वतःची घरे विकत घेता आली. एकप्रकारे यातून पोलीस कुटुंबीयांना हक्काचं आधार सिडकोने दिला होता. त्यानुसार सध्या काढलेल्या गृहनिर्माण योजनेत पोलिसांचा विचार करून त्यांना ५ टक्के राखीव कोटा ठेवावा, त्यामुळे अनेक पोलिसांना हक्काचे घर मिळेल अशी विनंती सामाजिक कार्यकर्ते म्हात्रे यांनी केली आहे.

घरांच्या किमतीबाबत संभ्रम कायम

सिडकोने यंदा गृहनिर्माण योजना आणली असली, तरी घरांच्या किमती मात्र जाहीर केलेल्या नाहीत. त्यामुळे या घरांमध्ये नोंदणी करणाऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे, त्यामुळे घराच्या किमतीसुद्धा लवकरात लवकर निश्चित करण्यात याव्यात, अशीही मागणी सुभाष म्हात्रे यांनी केली आहे.

दीडशे वर्षांनंतर लागला दिशादर्शक फलक



। कर्जत । प्रतिनिधी ।

> **दिशादर्शक फलक लावल्या असल्याने बाहेरून येणाऱ्या प्रवाशांची व पर्यटकांची चांगली सोय झाल्यामुळे रेल्वे प्रशासनाचे खूप खूप धन्यवाद.**
> **– पंकज ओसवाल, सामाजिक कार्यकर्ता, कर्जत**

कर्जत रेल्वे स्थानक १८६० साली सुरू झाले. मात्र, या स्थानकावर पूर्व दिशा कोणती व पश्चिम दिशा कोणती, असा संभ्रम नवीन प्रवाशांना पडत असे. मात्र, याबाबत सामाजिक कार्यकर्ते पंकज मांगीलाल ओसवाल गेल्या अनेक दिवसांपासून पाठपुरावा करीत होते. त्यांच्या पाठपुराव्याला यश येऊन कर्जत रेल्वे स्थानकावर दिशा दर्शविणारे फलक सुमारे १६३ वर्षांनी लावण्यात आले. त्यामुळे प्रवाशांना सोयीचे झाले आहे.

मुंबई-ठाणे रेल्वे धावल्यानंतर प्रथम १८५९ साली पळसदरी रेल्वे स्थानक निर्माण झाले. त्यानंतर १८६०-६१ मध्ये कर्जत रेल्वे स्थानकाची निर्मिती झाली. त्यानंतर अगदी फलाट वाढले, स्वयंचलित जिने आले, अनेक सुविधा झाल्या; परंतु कर्जत रेल्वे स्थानकात पूर्व दिशा कोणती व पश्चिम दिशा कोणती, असा प्रश्न नवीन प्रवाशांना पडत असे. कर्जत तालुका पर्यटनासाठी प्रसिद्ध असल्याने शनिवार व रविवारी प्रचंड गर्दी रेल्वे स्थानकावर होत असते. त्यामुळे नवीन प्रवासी व पर्यटकांमध्ये दिशेबद्दल संभ्रम होत असे. ही बाब ओसवाल यांच्या लक्षात आली व त्यांनी पाठपुरावा सुरू केला. त्याला यश येऊन दिशादर्शक फलक लावण्यात आले.

पान १ वरून

नवी मुंबई विमानतळावर उतरलं पहिलं विमान

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा रनवे, सिग्नल यंत्रणा अशी सर्व महत्त्वाची कामे जवळपास पूर्ण झाल्याची माहिती समोर येत असून, विमानतळाच्या टर्मिनल इमारतीचे काम अंतिम टप्प्यात आहे. महिन्याभरापूर्वीच लष्कराच्या विमानाची यशस्वी लँडिंग चाचणी करण्यात आली होती. त्यामुळे आता थेट व्यावसायिक विमानाचे लँडिंग करण्यात आले असून, यावेळी नागरी विमान वाहतूक महासंचालनालय (DGC), भारतीय विमानतळ प्राधिकरण (AAI) आणि इतर प्रमुख एजन्सींसह भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी, सिडको आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.

देशातील दुसरे मोठे विमानतळ

हैदराबाद येथील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळानंतर नवी मुंबईतील विमानतळ हे दुसरे देशातील सर्वात मोठं विमानतळ आहे. जवळपास ५,९४५ एकर जागेवर हे विमानतळ उभारण्यात आलं आहे. मुंबईपासून ४० किमी अंतरावर पनवेलजवळ हे विमानतळ बांधण्यात आले आहेत.

सात वर्षीय मुलीवर अत्याचार

पीडित अल्पवयीन मुलीच्या तक्रारीनुसार रेवदंडा पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे. याबाबत तपासिक अंमलदार म्हणून अलिबाग पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस उपनिरीक्षक एम.टी. शिंदे ह्या विशेष तपास करीत आहेत. तर, रेवदंडा पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार कृष्णकांत थळे हे दाखल अंमलदार आहेत. मुरूड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर यांच्याकडे रेवदंडा पोलीस ठाण्याचा अतिरिक्त कार्यभार असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली या घटनेचा तपास सुरू आहे.

महिलेच्या खूनप्रकरणी पतीसोबत पत्नी, मुलीला अटक

काही दागिने त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी विकले आणि काही दागिने नव्याने बनवून वापरण्यासाठी घेतले. त्यानंतर मृत महिलेचा चोरलेला मोबाईल साहू याने मध्य प्रदेशातील जावयाला दिला. जावयाने त्याचे सिम कार्ड टाकून मोबाईल फोन चालू केला असता लोकेशनद्वारे गुन्हे शाखेचे पोलीस मध्य प्रदेश येथे पोहोचले. त्यांनी जावयाकडे चौकशी केली असता हा मोबाईल त्याचा सासरा शरद साहू यांनी दिला असल्याची माहिती पोलिसांना दिली. त्यानुसार पोलिसांनी शरद साहू याला अटक केली. चोरीच्या दागिन्यांबद्दल त्याच्याकडे चौकशी केली असता ते दागिने विकले असल्याची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याची पत्नी आणि मुलगी यांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांच्याकडून दागिने हस्तगत केले आहेत. शरद साहू याला न्यायालयात हजर केले असता ३० डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

खा. तटकरेंची पेणकरांना सापत्न वागणूक

आजही पेणकरांची ही इच्छा पूर्ण झालेली नाही.

मागच्या लोकसभा निवडणुकीत खा. तटकरेंनी पेण तालुक्यात झालेल्या जाहीर सभांमध्ये पेणकरांसाठी लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. पेणकरांनीसुद्धा त्यांच्या या आश्वासनावर विश्वास ठेवून भरभरून मतदान केले. थोडे थोडके नाही तर ४७ हजारांचे मताधिक्य पेणकरांनी सुनील तटकरे यांना दिले. परंतु, जेव्हा लांब पल्ल्याच्या गाड्या थांबवण्याची वेळ आली, त्या वेळेस 'फावडे आपल्याच अंगावर माती ओढते' या म्हणीप्रमाणे खा. सुनिल तटकरे यांनी पेणकरांना सावत्र वागणूक देत लांब पल्ल्याच्या गाड्या रोहा रेल्वे स्थानकावर थांबविण्यासाठी प्राधान्य दिले.

मुंबईच्या खोल समुद्रात मासेमारी बोटीला अपघात

नौकांनी सुखरुप बाहेर काढले. तसेच याच ग्रुपच्या आठ बोटीने नौका बांधून आणली. आज ही नौका मढ, तलपशा बंदरात पोहोचण्याचा अंदाज आहे. यावेळी नेव्ही/कोस्ट गार्डचे जहाज बरोबर आहे. तसेच दोन अधिकारी रात्रीपासून नौकांवर मदत करत आहेत

...जीव गुदमरतोय

धोकादायक कारखान्यांना हद्दपार करावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून जोर धरत आहे. या पत्रकार परिषदेत जनतेचा आक्रोश पाहता जोरदार घोषणा देत मोठा असंतोष पाहायला मिळाला. लहानथोरांनी यावेळी बैठकीत आपली खंत व्यक्त केली. भविष्यात या आंदोलनाची दिशा अधिक तीव्र स्वरूपाची करीत सर्व ग्रामस्थांनी संपूर्ण कुटुंबासह उपोषण आंदोलन करू, असा इशारा ग्रामपंचायत, तहसील, प्रदूषण कार्यालय, पर्यावरणमंत्री यांच्याकडे करण्यात आली असल्याचे वयाळ ग्रामस्थांनी सांगितले.

विद्यार्थ्यांनी गुरुजनांवर विश्वास दाखवावा

संयुक्त सचिव विवेक पोतदार यांची सूचना

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ विद्या मंदिर शाळेमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूजनांवर विश्वास दाखवावा, अशी सूचना संस्थेचे संयुक्त सचिव विवेक पोतदार यांनी केली. दरम्यान, माध्यमिकवर्गातील विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ आणि वार्षिक गुणदर्शन समारंभाचे आयोजन केले होते.

विद्या मंदिर मंडळाच्या नेरळ ममदापूर येथील नेरळ विद्या मंदिर शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन निमित्त आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून हर्णे मेडिकल कॉलेजचे प्राचार्य डॉ. अदिती पिंपळखरे तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संयुक्त सचिव विवेक पोतदार, संस्थेचे विश्वस्त डॉ. मिलिंद पोतदार, शिक्षण विभागाचे केंद्र प्रमुख खैरे, तर कार्यकारिणी सदस्य रमेश कुंभार, सुशांत बदले तसेच सुरेश कदम यांच्यासह नेरळ विद्या मंदिर मुख्याध्यापक पी.बी. विचवे, उपमुख्याध्यापक गुजराती, पर्यवेक्षक गिरासे, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार इंगळे, प्राथमिक विभगाच्या मुख्याध्यापिका पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. पालक शिक्षक संघाचे अभंगे, भावसार, हरेश सोनावळे, तसेच राजू झुगरे, सुभाष नाईक यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत सांस्कृतिक समिती प्रमुख शिल्पा लाड आणि बक्षीस समिती प्रमुख वैशाली अभ्यंग यांनी केले, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय शिंदे यांनी केले. सुरुवातीला प्रास्ताविक मुख्याध्यापक पी.बी. विचवे यांनी तर क्रीडा शैक्षणिक अहवाल वाचन उपमुख्याध्यापक एम.के. गुजराती यांनी केले. सुरुवातीला दहावीमध्ये गुणवंत झालेल्या तसेच प्रत्येक विषयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. यावर्षीचा आदर्श विद्यार्थिनी ऋतुजा गणेश भाईर, तर आदर्श विद्यार्थी म्हणून प्रथमेश संभाजी सरनोबत यांचा सन्मान करण्यात आला.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वर्णे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक प्रदिप रघुनाथ गावडे यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे. आर.	आकार रु. पै.
२७	१	०-०३-००	०-०२

सबब सदर वर नमुद केलेल्या मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर वर नमुद केलेली मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : - २९/१२/२०२४

ॲड. कमलेश शिवधारी पाल
बी.ए.एल.एल.बी.
घर नंबर १७६, विश्वनगर, गुंडगे,
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक **दिपाली राहुल शिंदे व इतर** यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

मौजे - ढाक तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

भूमापन क्र.व उपविभाग /सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर	क्षेत्र (हे.आर.पॉ.)	आकार (रु.पै.)
४७/५/ब	एकुण क्षेत्र ०-८३-५० हे आर पॉ	४-६२

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक ३०/१२/२०२४

खरेदीदारातर्फे वकील **ॲड. निलेश कान्हू मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९. तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

जाहीर नोटीस

दि. ३०/१२/२०२४

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालकांकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

मौजे-कोंदिवडे, तालुका- कर्जत, जि. रायगड
येथील जमिन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ	आकार रू. पै.
पंढरीनाथ लक्ष्मण राणे	३५	१	०.२६.००	०.५९

सदरची जमिन मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून ती विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तद्ंगभूत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण दान बक्षीस, फरोक्त साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, लिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासुन १४ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: कर्जत
दि. ३०/१२/२०२४

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
ॲड. उत्कर्षा सुरेश सोनावळे
पत्ता. श्रीसाई सावली अपार्टमेंट, दुसरा मजला,
दिवाणी न्यायालयासमोर, कोतवाल नगर,
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९०७५९९५९२८

जाहिर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १. शेखर मधुकर पेडणेकर रा. मु. भोकरीचापाडा, पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत माझे आशिलांना कायमस्वरुपात विकत देण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग क्र.	क्षेत्र हे. आर.	आकार रु. पै.
झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड	३४८ जूना गट नं. ४६७	०-५९-५० पो.ख. ०-०३-६० एकूण क्षेत्र ०-६३-१०	१३.१०

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरुन माझे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :

सही/-
ॲड. रिया गणेश पाटील
जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड
रा. मु. नेहुली, पो. खंडाळे,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबाईल नं. ८८०५३२८६४६/९६०७३३१९७५

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी पर्यटकांची मांदियाळी

● नाताळ निमित्त व नव वर्षाच्या स्वागतासाठी पर्यटक मुरुड तालुक्यातील समुद्रकिनाऱ्याचा आनंद घेण्यासाठी येत आहेत. मुरूड किनारा सुशोभिकरणामुळे भेडसवणारी पार्किंगची समस्या देखील सुटली आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

मुरुड समुद्रकिनाऱ्यावर तुफान गर्दी

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

सरत्या वर्षाला निरोप देत नविन नववर्षाच्या स्वागतासाठी मुरुड पर्यटन क्षेत्रावर मोठ्या संख्येने पर्यटकांची गर्दी केली आहे. नविन वर्षे सुरू होण्यासाठी अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. नववर्षाच्या स्वागतासाठी अनेक जण विविध ठिकाणी फिरायला जात असतात. याच पार्श्वभूमीवर मुरुडला पर्यटकांनी चांगली पसंती दिली आसुन पर्यटकांनी समुद्रकिनारे बहरले आहेत. समुद्रकिनारावरील हॉटेल, लॉजिंग, रेस्टॉरंट विद्युत रोषणाईने सजले आहेत. तसेच, पर्यटकांनी घोडागाडी, ऊंटस्वारी, बाईकस्वारी, सायकलस्वारी करणे पसंत केले आहे. नववर्षाच्या स्वागतासाठी पर्यटकांची गर्दी वाढत असल्यामुळे वाहतुक व्यवस्था ही विस्कळीत होत आहे.

मत्स्यव्यवसाय सहायक आयुक्तांची मनमानी

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा मत्स्यव्यवसाय सहायक आयुक्तांनी आदिवासी कातकरी समाजाचा पारंपरिक मासेमारीचा व्यवसाय हिरावून घेण्यासाठी जुन्या सरकारी परिपत्रकाचा आधार घेऊन मनमानी सुरू केली आहे. त्यांनी महाड व पोलादपूर तालुक्यातील आदिवासी बांधवांचे मासेमारीचे ठेके नूतनीकरण करण्याऐवजी रद्द केले आहेत. यामुळे संतप्त आदिवासी कातकरी बांधवांनी मत्स्यव्यवसाय विभागाचे रायगड जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त संजय पाटील यांना शुक्रवारी (दि.२७) घेराव घातला होता.

महाड व पोलादपूर तालुक्यातील आदिवासी कातकरी समाजाचा पारंपारिक व्यवसाय मासेमारी आहे. या समाजबांधवांना शासनाने मासेमारी हक्कासाठी तलाव ठेक्याने दिलेले होते. यंदा जूनमध्ये त्यांचे मासेमारी हक्काचा ठेका मुदत संपल्याने ठेक्यांचे नुतनीकरण करण्यासाठी आदिवासी बांधवानी प्रस्ताव संबंधित कार्यालयात सादर केले. मात्र, त्यावर गेल्या ४ महिन्यांपासून कोणतीही कार्यवाही न केल्याने आदिवासी बांधवांनी तलाव ठेक्याची लिखित स्वरुपात मागणी केली होती. मात्र, ते देता येणार नाहीत असे उत्तर देत तलावातून जुन्या सरकारी परिपत्रकानुसार मत्स्योत्पादन घेतले जात नसल्याने ठेके रद्द

आदिवासी कातकरी समाजाचा घेराव

होत असल्याचे मत्स्यव्यवसाय विभागाचे रायगड जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त संजय पाटील यांनी सांगितले. तसेच, माझ्या हातात काहीच नाही अशी उडवा उडवीची उत्तरे देखील जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त संजय पाटील यांनी दिली होती. त्यामुळे त्यांना घेराव घालत शुक्रवारी याबाबत निवेदन देण्यात आले. यावेळी सर्वश्री देवपूर व खडपी माजी सरपंच दिपक साबळे, पोलादपूर येथील आदिवासी विविध कार्यकारी संस्था मर्या. जोगेश्वरी गाडीतळचे चेअरमन काशिनाथ पवार, कातकरी आदिवासी आधार संघटना पोलादपूर अध्यक्ष पांडुरंग वाघे, रायगड आदिवासी मच्छीमार विविध कार्यकारी सहकारी संस्था कोथुर्डेचे गोविंद हिलम, चापगाव-महाडचे माजी सरपंच पांडू नथू काटकर, कोथुर्डेचे ग्रा. पंचायत सदस्य किसन सिताराम पवार, खैरे आदिवासी मच्छिमार वि.का.सहकारी संस्था मर्या.चे चेअरमन मिथुन मुकणे,जननीदेवी आदि. मच्छिमार वि.का. सह. संस्था मर्या. आंबवडेचे चेअरमन अशोक मुकणे, आदिवासी कातकरी मच्छिमार वि.का. सह. संस्था मर्या. वरंधचे चेअरमन चंद्रकांत निकम हे उपस्थित होते.

वाहतूक पोलिसांचे कौस्तुकापद काम

। श्रीगांव । वार्ताहर ।

सतत आलेल्या सुट्यांमुळे अलिबाग व मुरूडकडे पर्यटकांचा प्रचंड कल आहे. हजारोंच्या संख्येने वाहने वडखळबाजूने अलिबागकडे आली आहेत. दरम्यान, वाहतुक कोंडी टाळण्यासठी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे यांच्यासह वाहतुक पोलीस तसेच होमगार्ड यांनी देखील कंबर कसली आहे. त्यामुळे फारसी वाहतूक कोंडी झालेली दिसून येत नाही. तसेच, देहेन श्रीगावमार्गे पेझारी असा पर्यायी मार्ग उपलब्ध केल्यामुळे वाहतूक सुरळीतपणे चालू आहे.

राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा संपन्न

। उरण । प्रतिनिधी ।

सानपाडा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पारस काव्या कला जनजागृती संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्ताने विविध क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्यांना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये नेहा पाटील (मु.बोरखर) हिला क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्यामुळे क्रीडारत्न पुरस्कार, हर्षद वसंत पाटील (मु.वावंज) यांना क्रीडा क्षेत्रातील चांगले विध्यार्थी घडविल्यामुळे क्रीडा भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

गोवेले कोंड स्वप्नातील गाव

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यातील गोवेले कोंड हे गाव २७ डिसेंबर रोजी स्वप्नातील गाव म्हणून घोषित झाले. या घोषणा सोहळ्याने संपूर्ण परिसरात आनंदाची लहर निर्माण केली. गावाने स्वप्नातील गावाचे ८०% मापदंड पूर्ण करत आपले ध्येय गाठले.

२०२३ मध्ये गाव विकास समितीने आणि ग्रामस्थांनी एकत्र येऊन समृद्ध गाव घडवण्याचा निर्धार केला. स्वदेस फाऊंडेशनच्या सहकार्याने गावाने व्यावसायिक दृष्टिकोनातून गाव विकास आराखडा तयार केला. महिलांनी घरांच्या रंगकामातून व रस्त्यांच्या स्वच्छतेतून गावाला एक वेगळाच चेहरा दिला. गावातील युवकांनी डिजिटल तंत्रज्ञान शिकून गावासाठी नवीन कल्पना राबवल्या. या सर्व प्रयत्नांमुळे गोवेले कोंडला 'स्वप्नातील गाव' हा सन्मान मिळाला.

घोडीवली-अंजरून रस्त्याची चाळण

। पाताळगंगा । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातील काही रस्त्याची अवस्था ही दयनीय बनल्याने रस्त्यावरील खड्ड्यांमुळे प्रवासी वर्गाला व वाहन चालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच खालापुर येथील घोडीवली-अंजरून गाव या मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरलेले आहे. त्यामुळे, या मार्गावरून प्रवास करणे वाहन चालकांसह प्रवासी वर्गाला जिकरीचे बनले आहे. या मार्गाची अक्षरशः चाळण झाल्याने प्रवासी वर्गात नाराजीचे सूर उमटू लागले आहेत. तसेच, संबंधित प्रशासनाने गांभीर्याने घेत या ठिकाणी विशिष्ट निधी उपलब्ध करून देत हा मार्ग लवकरात लवकर खड्डेमुक्त करावा, अशी मागणी होत आहे.

या मार्गावरून दररोज शेकडो शाळकरी विद्यार्थी, महिलावर्ग व प्रवासी वर्ग ये-जा करत असतो. तसेच, पायी चालताना अनेकांचे पाय खड्ड्यात पडून मुरगळणे तसेच खड्ड्यातील मोठमोठाल्या दगडांमुळे गाडी स्लिप होणे, असे अपघात घडत असतात. त्यात अनेक जण जखमी होत असल्यामुळे प्रवासी वर्ग या रस्त्याबाबत संताप व्यक्त करत आहेत. त्यामुळे या रस्त्याची दुरुस्ती केव्हा होते, याकडे साऱ्यांचे लक्ष लागून राहिला आहे.

ई-रिक्षांत वाढ करण्याची मागणी

नववर्षाच्या स्वागतासाठी माथेरानला पसंती

। माथेरान । वार्ताहर ।

नाताळ आणि नववर्षाच्या स्वागतासाठी पर्यटकांनी माथेरानला पसंती दिली आहे. परंतु, वाहतुकीच्या गहन समस्यांना सामोरे जात प्रवास करावा लागत असल्यामुळे लवाजम्यासह आलेल्या पर्यटकांची त्रेधातिरपीट उडत आहे.

ई-रिक्षाची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे कधी नव्हे एवढी पर्यटकांची गर्दी माथेरानमध्ये पाहायला मिळत आहे. ई-रिक्षाच्या स्टँडवर अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने ई-रिक्षा संघटना उत्तम प्रकारे सेवा देत आहेत. विशेष म्हणजे या ई-रिक्षाच्या स्वस्त आणि सुरक्षित सेवेचा लाभ घेण्यासाठी पर्यटक सुद्धा आपला अमूल्य वेळ खर्च करून ताटकळत उभे राहून चांगल्या पद्धतीने प्रतिसाद देत आहेत.

तसेच, या सेवेचा पायलट प्रोजेक्ट पूर्ण झाला असून फक्त २० रिक्षांच्या माध्यमातून सेवा उपलब्ध करून देणे चालकांना त्रासदायक बनले आहे. संघटनेची त्यांच्या हक्काची उर्वरीत एकूण ७४ बाकी असलेल्या ई-रिक्षांची मागणी आहे. या सर्व रिक्षा उपलब्ध झाल्यास सर्वांचा प्रवास सुखकर होणार असून यापुढेही येथो मोठ्या प्रमाणावर पर्यटन क्रांती घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

> “आमच्यासाठी ई-रिक्षांची सुविधा ही खरोखरच कौतुकास्पद बाब आहे. परंतु, येथे मोठ्या प्रमाणावर पर्यटक येत असतात, तर २० रिक्षा खूपच कमी आहेत. सरकारने या ठिकाणी अजूनही रिक्षांना प्राधान्य दिले तर आमचा वेळ वाचेल आणि पर्यटक जास्त प्रमाणात येतील. त्यामुळे इथल्या गोरगरिबांना रोजगार देखील मिळेल.”
>
> –निरंजन हातनोलकर, पर्यटक मुंबई

> “गर्दीच्या वेळी पर्यटकांना ई-रिक्षाच्या रांगेचे नियोजन मी निस्वार्थीपणे करीत असतो. ई-रिक्षाची संख्या कमी असल्याने ज्येष्ठ नागरिक, महिलांना तासनतास ई-रिक्षाची वाट पहावी लागते. तसेच, पायलट प्रोजेक्टचा कालावधी देखील पूर्ण झाला असून सनियंत्रण समितीने ई-रिक्षांची संख्या वाढवावी.”
>
> – जनार्दन पार्टे,
> सामाजिक कार्यकर्ते, माथेरान

श्रीवर्धनमध्ये पर्यटकांची तुफान गर्दी

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

डिसेंबर महिन्यातील शेवटचा शनिवार व रविवार तसेच सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी श्रीवर्धनमध्ये पर्यटकांचा अलोट सागर उसळलेला आहे. श्रीवर्धन शहरामध्ये पर्यटकांबरोबरच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहली देखील मोठ्या प्रमाणावर येत आहेत. सहलीच्या बस गाड्या श्रीवर्धन शहरामध्ये शिरल्यानंतर या ठिकाणी प्रचंड प्रमाणात वाहतूककोंडी होते. त्यामुळे समोरासमोरून दोन मोठी वाहने पास होत नाहीत. त्यासाठी वाहतुकीचे योग्य नियमन करण्यासाठी श्रीवर्धन पोलिसांनी विविध प्रकारे पावले उचललेली आहेत.

नाताळच्या सुट्ट्यांचा हंगाम असल्यामुळे पर्यटकांनी श्रीवर्धन तालुक्यातील सर्वच समुद्र किनाऱ्यांना पसंती दिली आहे. श्रीवर्धन बरोबरच हरिहरेश्वर, दिवेआगर व आरावी या ठिकाणी देखील समुद्रकिनाऱ्यावरती खूप मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. पर्यटकांच्या प्रचंड गर्दीमुळे या ठिकाणी असणारे हॉटेल व्यवसायिक, त्याचप्रमाणे लॉजिंग बोर्डिंग व रिसॉर्टचे मालक यांच्यामध्ये आनंदाचे वातावरण पसरलेले आहे. श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावरती प्रत्येक शनिवारी व रविवारी सायंकाळी ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात येत असून यामध्ये येणाऱ्या पर्यटकांना तसेच स्थानिक गायक यांना देखील गाण्याची संधी देण्यात येत आहे.

हत्या आणि राजकारण

राज्य विधानसभेत दोनतृतियांश बहुमत मिळवून महायुती सत्तेत आल्याला जेमतेम महिना झाला आहे. पण हे यश विसरून जावे अशा घटना गेल्या महिनाभरात घडल्या आहेत. परभणीमध्ये आंबेडकर पुतळ्याची विटंबना, दलित समाजाचा उद्रेक आणि नंतर एका कार्यकर्त्याचा तुरुंगात झालेला मृत्यू हा नव्या सरकारच्या प्रशासनावरचा काळा डाग आहे. या प्रकरणात गृहमंत्री फडणवीस काय कारवाई करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ते चालू असतानाच बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण पुढे आले आहे. परभणीतील दोन दलित कार्यकर्त्यांच्या मृत्यूंचा प्रकार बाजूला पडावा म्हणून देशमुख प्रकरणाला इतके महत्व दिले जात आहे का असाही काही लोकांचा सवाल आहे. पण तो बाजूला ठेवला तरी देशमुख प्रकरणाने विशेषतः मराठवाड्यातील वातावरण ढवळून निघाले आहे. शनिवारी दिल्लीत मनमोहनसिंगांवर अत्यंसंस्कार होत असतानाच बीडमध्ये देशमुख प्रकरणात सर्वपक्षीय प्रचंड मोर्चा चालू होता. यामध्ये छत्रपती संभाजीराजे, मनोज जरांगे, शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे असे हजर होते. या प्रकरणातील आरोपींचे धनंजय मुंडे यांच्याशी थेट संबंध आहेत असा सर्वांचा दावा आहे. त्यामुळे वरवर पाहता हा मुंडे आणि त्यांचे विरोधक असा सामना वाटत असला तरी त्याला वंजारी विरुध्द मराठा अशी जातीय किनारही आहे व ती अधिक चिंतेची बाब आहे. मराठ्यांना राखीव जागा मिळाल्या पाहिजेत या मागणीसाठी जरांगेंनी गेल्या वर्षीपासून जो उपोषणांचा सिलसिला सुरू केला त्यातून मराठा विरुध्द ओबीसी असा संघर्ष उभा राहिला. यापूर्वी मराठा समाजातर्फे विराट मोर्चे निघाले तरीही त्याला कोण्या एका जातीविरुध्दचा असंतोष असे स्वरूप आले नव्हते. जरांगे यांनी मराठ्यांना ओबीसींमधून आरक्षणाची मागणी केल्याने या दोन समाजांमध्ये तेढ निर्माण झाली. लोकसभेच्या मतदानाच्या वेळी ती स्पष्टपणे दिसून आली. विधानसभेला मात्र हे डावपेच फसले आणि मराठा आंदोलनाची ताकदही कमकुवत झाली. त्या पार्श्वभूमीवर हे सर्व प्रकरण तपासण्याची गरज आहे.

वाल्मिक कराडचा उत्कर्ष

संतोष देशमुख यांची हत्या वाल्मिक कराड याच्या सांगण्यावरून झाली असा विरोधकांचा आरोप आहे. हा कराड गोपीनाथ मुंडे यांच्या काळापासून मुंडे कुटुंबियांचा निकटवर्तीय आहे. एकेकाळी ऑफिसबॉयसारखी कामे करून व नंतर व्हिसीआर भाड्याने देण्यासारखे किरकोळ व्यवसाय करून उपजीविका करणारा वाल्मिक नंतर मोठा कंत्राटदार झाला व शेकडो कोटींच्या उलाढाली करू लागला. त्याचा प्रवास हा महाराष्ट्रातील सर्वच पक्षातील व सर्वच जातींच्या अशा संधिसाधू आणि भ्रष्ट कार्यकर्त्यांच्या प्रवासासाशी मिळताजुळता आहे. मुंडे यांचे घर फुटल्यावर तो धनंजय यांच्यासोबत राहिला. परळीत नगराध्यक्ष कोणीही असला तरी खरा कारभार वाल्मिक चालवत होता असे म्हणतात. जमिनींचे व्यवहार, परळीतील औष्णिक केंद्रातील राख वाहून नेण्यासारखी कंत्राटे इत्यादींवर त्याने प्रचंड माया जमवली. त्याच्याविरुध्द आजवर चौदा गुन्ह्यांची नोंद असून या पवनउर्जा प्रकल्पात दोन कोटींची खंडणी मागितल्याचाही आरोप आहे. अशाच भानगडींमध्ये देशमुख याला धमकी देऊन त्याचा खून झाला आहे. त्या प्रकरणात काही आरोपींना अटक झाली असली तरी वाल्मिक हाच त्यातला मुख्य सूत्रधार आहे व त्याला अटक करावी अशी विरोधकांची मागणी आहे. धनंजय मुंडे यांनी आरोपी कोणीही असला तरी त्याला पाठीशी घालणार नाही अशी भूमिका घेतली आहे. फडणवीस हेदेखील रोज नव्या घोषणा करीत आहेत. मात्र हत्या झाल्याला वीस दिवस लोटूनही पोलिसांना वाल्मिक चौकशीसाठी देखील सापडू नये हे आश्चर्यकारक आहे. त्याला अटक करायची गोष्ट त्याहूनही पुढची आहे. हेच प्रकरण काँग्रेसवाले किंवा ठाकरे गटाच्या नेत्याचे असते तर फडणवीसांचा यंत्रणा विजेच्या वेगाने हलली असती व आरोपीविषयी अनेक कहाण्या प्रसृत झाल्या असत्या. त्याचे दाऊदपासून ते शरद पवार किंवा उद्धव ठाकरे इत्यादींसोबतचे फोटो दाखवले गेले असते. या प्रकरणात मात्र देवेंद्राच्या पोलिसांना लकवा मारल्यासारखी अवस्था आहे.

भाजपचे आगीत तेल

वाल्मिक कराड याचे एकूण पूर्वचरित्र पाहता त्याचा या प्रकरणात थेट हात असण्याची शक्यता आहेच. पोलिसांनी तात्काळ कठोर कारवाई करायलाच हवी. मात्र या प्रकरणाला जरांगे, संभाजीराजे इत्यादींच्या उपस्थितीतून जे जातीय वळण देण्याचा प्रयत्न होतो आहे तो धोकादायक आहे. मुंडे हे अजित पवारांचे अत्यंत निकटवर्तीय आहेत. नव्या सरकारात त्यांना अडचणीत आणण्यासाठी खुद्द भाजप आणि शिंदे गटाचे लोकही आगीत तेल ओतत आहेत की काय अशी शंका घ्यायला जागा आहे. हे प्रकरण पेटते ठेवून मुंडे यांना बदनाम करायचे, त्यांच्या राजीनाम्याच्या अधिकाधिक मागण्या होऊ द्यायच्या असा हा भाजपचा बनाव आहे की काय हेही तपासायला हवे. बीडमध्ये काल निघालेल्या मोर्चामध्ये भाजपचे आमदार व देवेंद्रांचे समर्थक सुरेश धस तसेच अभिमन्यू पवार ठळकपणे सामील होते. मुंडे यांचे त्यांच्यात पक्षातले विरोधक आमदार प्रकाश सोळंके हेदेखील यावेळी हजर होते. त्यांनी मुंडे यांना मंत्रिपदावरून बाजूला करण्याची मागणी केली. त्यामुळे अजितदादांच्या पक्षात दुही निर्माण करण्याचा हा पद्धतशीर प्रयत्न दिसतो आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात खुद्द शरद पवार यांनी धनंजय मुंडे यांच्या अनेक उपद्व्यापांबाबत सूचक विधान केले होते. महिलांशी असलेल्या संबंधांवरून मुंडे पूर्वीही वादाच्या भोवऱ्यात सापडले होते. आता या प्रकरणाच्या निमित्ताने मुंडे यांच्या वर्चस्वाला शह देण्याचे सर्व बाजूंनी प्रयत्न सुरू दिसतात. फडणवीस यांनी नाइलाजाने पंकजा यांना मंत्रिमंडळात सामील केले असले तरी त्यांना या निमित्ताने इशारा देण्याचाही हा प्रकार असू शकतो. यातील आरोपींना फासावर चढवलेच पाहिजे. वाल्मिक कराड हा गुन्हेगार असेल तर त्यालाही शिक्षा व्हायलाच हवी. प्रसंगी मुंडे यांनाही हटवायलाच हवे. मात्र एका हत्येच्या प्रकरणाचे असा राजकीय गैरफायदा घेण्याचा हा प्रकार दुर्दैवी आहे. त्यातही त्याला लागणारे जातीय वळण अधिक चिंताजनक आहे.

विचार

‘सहमती एक्सप्रेस’ला ग्रीन सिग्नल

खातेवाटप पार पडले असले तरी महायुतीच्या सहमती एक्सप्रेसला ट्रॅकवर यायला बराच काळ लागला. मिळालेल्या भरपूर जागांमुळे मित्रपक्षांवर दबाव आणून महत्त्वाची खाती पदरात पाडून घेण्याचा भाजपचा प्रयत्न होता; परंतु एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे रुसवे-फुगवे काढताना ‘सहमती एक्सप्रेस’ जागेवरच थांबून होती. ती पुढे निघाली असल्याने आता जनसेवेची अपेक्षित गती लाभावी अशी, जनसामान्यांची इच्छा आहे.

राही भिडे

विधानसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचे सरकार स्थापण्यास ११ दिवस, मंत्रिमंडळ विस्तारास त्यानंतरचे १२ दिवस आणि खातेवाटपाला त्यानंतर सहा दिवस असे जवळजवळ २९ दिवस लागले. एकंदरीत, महायुतीच्या सहमती एक्सप्रेसला प्रत्यक्ष ट्रॅकवर यायला बराच काळ लागला. महाराष्ट्रासारख्या मोठ्या राज्यात एक महिनाभर सरकार होते की नाही, असा प्रश्न पडावा अशी स्थिती होती. राज्यात भाजपला मिळालेल्या जागांमुळे मित्रपक्षांवर दबाव आणून महत्त्वाची खाती पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न होता; परंतु एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचे रुसवे-फुगवे काढताना ‘सहमती एक्सप्रेस’ जागेवरच थांबून होती. गृह आणि अर्थ या दोन्ही खात्यांसाठी भाजपचा प्रयत्न होता; परंतु गृहखाते फडणवीस यांना स्वतःकडे ठेवता आले. राज्यात तीन महिन्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असल्याने गृह, नगरविकास आणि अर्थ ही तीन खाती ताब्यात असणे महत्त्वाचे होते. महायुतीच्या तीनही पक्षांना एक एक महत्त्वाचे खाते मिळाल्याने समाधान मानून आता जोमदार कामाला सुरुवात व्हायला हरकत नाही. खातेवाटपाचा अधिकार मुख्यमंत्र्यांकडे असला, तरी दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या मदतीने खातेवाटप करताना बरेच हिशेब चुकते करण्यात आले, काहींना धक्का देताना काहींवर नव्याने मोठा विश्वास टाकतानाही तिथे अन्य कुणाला तरी राजकीय शह देण्याचा हेतू दिसला. काहींना मंत्रिमंडळात घेणे ही अपरिहार्यता होती, म्हणून त्यांची वर्णी लागली; परंतु त्यांच्या वाट्याला आलेले खाते पाहिले, तर त्यांचे खच्चीकरण केल्याचे किंवा त्यांना धडा शिकवल्याचे अनेकांच्या बाबतीत सूचित होते.

निवडणुकीमध्ये भाजपला जास्त जागा मिळाल्याने स्वाभावीकच या पक्षाच्या जास्त आमदारांना मंत्रिमंडळात स्थान आणि त्याखालोखाल एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या पक्षाला स्थान मिळाले. जनतेशी संबंधित खात्याचा विचार केला, तर अजित पवार यांच्या पक्षाला जास्त मंत्रालये मिळाल्याचे दिसते. मंत्रिपदाचे वाटप करताना काहींकडे पूर्वीच्या महायुतीतील खातीच कायम ठेवण्यात आली. काहींना आपले पूर्वीचे खाते बदलावे असे वाटत होते; परंतु त्यांचा जसा अपेक्षाभंग झाला, तसाच पूर्वीचे खातेच मिळावे, यासाठी प्रयत्न करणाऱ्यांचाही झाला. पूर्वीची चांगली खाती असणाऱ्यांना किमान त्याहून चांगली खाती मिळणे अपेक्षित असताना त्यांना दुय्यम खाती देऊन इतरत्र ढवळाढवळ न करण्याचा किंवा पक्षीय शिस्त मोडून थेट पक्षश्रेष्ठींशी संपर्क ठेवू पाहणाऱ्यांना जमिनीवर आणण्याचा धडा शिकवण्यात आला. एक प्रकारे हा सूचक इशारा आहे. राज्याच्या नेतृत्वाला आव्हान देणे किंवा त्यांच्या अपरोक्ष थेट दिल्लीशी संबंध ठेवले, की आधुनिक अभिमन्यू चक्रव्यूह भेदताना किती लोकांना धारातीर्थी कोसळवतो, हे या निवडणुकीनंतरच्या महिनाभरातील घडामोडींनी दाखवून दिले आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बहुप्रतिक्षित खातेवाटपात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृह आणि सामान्य प्रशासन (जीएडी), ऊर्जा (नवीनीकरण ऊर्जा वगळून), विधी व न्याय आणि माहिती-जनसंपर्क ही महत्त्वाची खाती आली आहेत. शिंदे यांच्याकडे नगरविकास खात्यासह गृहनिर्माण आणि सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम-एमएसआरडीसी) तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे वित्त आणि उत्पादन शुल्क खाते असणार आहे. मंत्रिमंडळ विस्तारात भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना सर्वात अगोदर शपथ घ्यायला निमंत्रित केले, तेव्हाच महसूल खाते त्यांच्याकडे जाणार हे स्पष्ट होते. मंत्रिमंडळात शिंदे यांच्या शिवसेनेकडे महत्त्वाची खाती आहेत. नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम खाते तसेच सिडको, एमएमआरडीएवर शिंदे यांचे वर्चस्व राहणार आहे. अजितदादांकडे राज्याच्या तिजोरीच्या चाव्या असल्या, तरी खर्चाचे सर्व अधिकार शिंदे यांच्याकडे राहणार आहेत. बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित तसेच अनेक रुसव्या फुगव्यांच्या मालिकेनंतर महायुती सरकारमधील मंत्र्यांना शपथविधीनंतर एका आठवड्यानंतर खातेवाटप करण्यात आले. या खातेवाटपामधून फडणवीस यांनी आपण कुणाचाही दबाव सहन करणार नाही, असे दाखवून दिले आहे. अजितदादांनी अर्थ खाते आपल्याकडेच ठेवले असून उत्पादन शुल्क खातेही स्वत:कडे खेचून आणले आहे.

भाजपच्या १९ मंत्र्यांमध्ये साताराचे शिवेंद्रराजे भोसले आणि जयकुमार गोरे यांनी पहिल्यांदा कॅबिनेट मिळवतानाच थेट वजनदार खाती मिळवली आहेत. पश्चिम महाराष्ट्रात आपला दबदबा वाढवण्यासाठी फडणवीस यांनी नव्या शिलेदारांकडे मोठी जबाबदारी दिली आहे. शिवेंद्रराजे यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे. गोरे यांच्याकडे ग्रामविकास, पंचायती राज अशा खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यामुळे दोघांनाही पहिल्यांदा कॅबिनेट मिळूनही सरकारमधील वजनदार आणि महत्त्वपूर्ण खाती मिळाली आहेत. हीच गोष्ट अजितदादांच्या माणिकराव कोकाटे यांची. त्यांनाही पहिल्यांदाच सामावून घेताना कृषि खाते दिले गेले आहे. मंत्रिमंडळ विस्तारात डावललेल्या छगन भुजबळ यांच्यासारख्यांना शह देण्यासाठी केलेली ही खेळी आहे. धनंजय मुंडे यांच्याविरोधात बीडच्या संतोष देशमुख यांच्या खून प्रकरणामुळे असलेली नाराजी आणि पीक विमा घोटाळ्यात होत असलेले आरोप लक्षात घेऊन पूर्वी भुजबळांकडे असलेले अन्नपुरवठा हे खाते देण्यात आले असले, तरी कृषी खात्याच्या तुलनेत ते कमी महत्त्वाचे आहे. नाशिक जिल्ह्यातून अजितदादांचे सात आमदार निवडून आल्याने या जिल्ह्याला जादा प्रतिनिधित्व मिळणे अपेक्षितच होते. त्यातही नरहरी झिरवळ यांच्यासारख्या ज्येष्ठ आदिवासी नेत्याला मंत्रिमंडळात घेऊन अन्न आणि औषध प्रशासन खात्याची जबाबदारी टाकण्यात आली आहे.

दोनच दिवसांपूर्वी प्रा. राम शिंदे यांच्या सभापती निवडीच्या वेळी अजितदादांनी भाजपचे संकटमोचक गिरीश महाजन यांना आता तरी सुधरा, थोडक्यात वाचलात; असा टोला लगावला होता. आता त्यांना देण्यात आलेली जबाबदारी पाहता त्यांचे पंख छाटण्यात आले आहेत. युतीच्या सरकारमध्ये पहिल्यांदाच कृषी, नंतर शिक्षण, दुग्ध, परिवहन, विधी आणि मागच्या मंत्रिमंडळात महसूल खात्याची जबाबदारी पाहणाऱ्या राधाकृष्ण विखे पाटील यांनाही तुलनेने गौण खाते दिले गेले आहे. महाजन आणि विखे पाटील यांच्याकडे जलसंपदा खात्याची जबाबदारी विभागून देण्यात आली आहे. विखे पाटील यांच्याकडे गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळाची जबाबदारी देण्यात आली आहे तर गिरीश महाजन यांच्याकडे विदर्भ, तापी आणि कोकण विकास महामंडळ तसेच आपत्ती व्यवस्थापन खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे. गोदावरी आणि कृष्णा खोऱ्यामध्ये पश्चिमेकडचे पाणी वळवण्यासाठी बाळासाहेब विखे पाटील यांनी भरपूर प्रयत्न केले. आता त्यांच्याच चिरंजीवांकडे या खात्याची जबाबदारी आल्याने अतितुटीच्या नगर जिल्ह्यातील लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. ते या खात्याला कसा न्याय देतात, हे पहावे लागेल. भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील यांच्याकडे उच्च आणि तंत्रशिक्षण खाते कायम राखण्यात आले. त्यांना मोठे खाते दिले जाईल, अशी अपेक्षा होती; परंतु ती फोल ठरली.

पंकजा मुंडे यांनी पूर्वी महिला, ग्रामविकाससारखी महत्त्वाची खाती सांभाळली होती; परंतु आता त्यांच्या वाट्याला तुलनेने कमी महत्त्वाच्या पर्यावरण खात्याची जबाबदारी देण्यात आली आहे. गृह, महसूल खाते आपल्याकडे ठेवण्यात भाजपला यश आले असले, तरी सार्वजनिक बांधकाम, गृहनिर्माण, अर्थ, नगर विकास ही खाती शिंदे आणि अजितदादांकडे गेली आहेत; मात्र या खात्यांमधील राज्यमंत्रिपदाची जबाबदारी फडणवीस यांच्या विश्वासू शिलेदारांकडेच आहे. नगरविकास खाते शिंदे यांनी आपल्याकडे ठेवले असले, तरी या खात्याच्या राज्यमंत्रिपदी माधुरी मिसाळ आहेत. अर्थ खाते अजितदादांकडे असले, तरी त्या खात्याच्या राज्यमंत्रिपदाची जबाबदारी आशिष जयस्वाल यांच्याकडे आहे. ते शिवसेनेत असले, तरी फडणवीस यांचे निकटवर्तीय मानले जातात. गुलाबराव पाटील, संजय राठोड, मंगलप्रभात लोढा, उदय सामंत यांच्याकडे पूर्वीची खाती कायम राहिली. अतुल सावे यांच्याकडे पूर्वीचे ओबीसी कल्याण खाते देताना ऊर्जा (नवीनीकरणीय ऊर्जा), दुग्धविकास ही खाती देण्यात आली. भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसने नवीन चेहऱ्यांकडे महत्त्वाची खाती सोपवून नवे नेतृत्व पुढे आणण्याच्या दृष्टीने पाऊल टाकले आहे. शिवसेनेच्या दादा भुसे यांनी आधी कृषी, रस्ते विकास अशी खाती भूषवली होती. यंदा त्यांच्याकडे शालेय शिक्षण हे डोकेदुखी ठरणारे खाते आले. राष्ट्रवादी काँग्रेसने कोकाटे (कृषी), बाबासाहेब पाटील (सहकार), मकरंद पाटील (मदत पुनर्वसन) अशा नव्या चेहऱ्यांकडे महत्त्वाची खाती सोपवली. जयकुमार रावल यांनाही पणन व राजशिष्टाचार ही तुलनेने कमी महत्त्वाची खाती मिळाली. भरत गोगावले यांना रोजगार हमी, फलोत्पादन, खारपाण पट्टा विकास या खात्यांवर समाधान मानावे लागले.

आजकाल

कोकणयात्रेतील अनुभव- विकासाची पर्यायी साधनं!

आशुतोष जोशी

विकासाची पर्यायी साधनं (models) आपल्याच हातात आहेत. ज्यांनी ह्या पर्यायी साधनांचा अवलंब केला आहे त्यांनी स्वतःच्या जाणीवा रुंदावत आपल्या आजूबाजूच्या लोकांनाही सामावून घेतलं आहे. याचाच अवलंब संपूर्ण कोकण किनारपट्टीवर (आणि खरंतर जगभर) करता येईल. ‘संपूर्ण क्रांती’ संकल्पनेवर आधारित! एक अंतर्गत क्रांती जी अखेरीस बाह्य परिस्थिती बदलेल. ही विचारसरणी गावकऱ्यांचा अंतर्बाह्य विकास घडवून आणेल.

मुद्दा असा आहे की आपण भौतिक गोष्टींवर अवलंबून आहेत आणि ही पर्यायी धारणा भौतिकेतेला दूर करते. साधी राहणी, उच्च विचारसरणी हे तत्व, धारणा यात अंतर्भूत आहे.

आपण कोकण भूतानच्या सांस्कृतिक पर्यटनासारखं किंवा व्हिएतनामच्या निसर्ग व कृषी आधारित पर्यटनाप्रमाणे विकसित का करू शकत नाही? देव, निसर्ग जे काही म्हणाल त्यांचं या भूमीला वरदान लाभलं आहे. विशाल अरबी समुद्राने 'अतिथी देवो भव' या संकल्पनेला अनुसरून सर्वांचं स्वागत केलं आहे. सह्याद्रीच्या रांगा साहसाला सामावून घेतात. चुकलेल्यांना शोधण्यासाठी, वाचवण्यासाठी या भूमीची कातकरी आणि धनगर लेकरं तत्पर असतात.

भात, नाचणी, वरी, नारळ, सुपारीचं पीक या भूमीवर निघतं. रसाळ आंबे आणि काजू इथेच मुबलक होतात. इथल्या दऱ्या, खोऱ्या, धबधबे, पायवाटा, किल्ले, बौद्ध विहार, मंदिरं, राखणदार, दर्गे, या गोष्टी कोकणाची शान वाढवतात. संतांची आठव करून देतात. सुधारणा आणि पुनर्बांधणी जाणणारी, करणारी ही भूमी आहे.

आपल्या पूर्वजांची नाळ निसर्गाशी जोडलेली आहे. आपल्या पूर्वजांनी ज्वालामुखीतून निर्माण झालेल्या शिळांवर १५ ते २०,००० वर्षांपूर्वीच्या कोरलेल्या इतिहासाच्या कहाण्या आहे. किनारपट्टीच्या सर्व भागात शेकडोनी हे शिलालेख पसरलेले आहेत. अशा सांस्कृतिक आणि पर्यावरणीय दृष्ट्या समृद्ध ठिकाणाला औद्योगिकतेच्या जाळ्यात का अडकवतो आहोत आपण? कसं बदलता येईल हे? आपण का तेल शुद्धीकरण, अणुऊर्जा, रासायनिक प्रकल्प, एमआयडीसी, घरं, इमारती आणि बंदरं या भागात ढकलत आहोत? या भूमीचा खरा विकास फक्त तेव्हाच होईल जेव्हा आपल्या पंचमहाभूतांचा सन्मान होईल. आपला देव म्हणजे निसर्ग. त्याचीच कोकणी माणूस प्रार्थना करतो.

निसर्गाला प्राधान्य देत सामुदायिकरित्या राबवलं जाणारं पर्यटनाचं उत्तम उदाहरण म्हणजे मंडणगडमधील नार्गोली हे छोटं गाव. पुण्यात शिक्षण क्षेत्रात काम करणारी संपदा आणि मधु यांनी या ही कल्पना राबविण्यासाठी या गावात जमीन खरेदी केली. परंतु इथे आल्यापासून वेगवेगळ्या समस्या भेडसावत राहिल्या. त्यांनी ही जमीन खरेदी केली तेव्हा सरकारी कर्मचाऱ्याच्या नावावर होती. एक वृद्ध दाम्पत्य या जमिनीचे खरे मालक होते हे नंतर कळलं. त्यांना या घडामोडींची कल्पनाही नव्हती. त्यांना खोटी आश्वासने देऊन, दारू पाजून जमीन आपल्या नावे करायला लावली. मालकांशी करार करून आणि त्यांना त्यांच्या गोठ्यासाठी जागा देऊन आपलं काम सुरू केलं. जमिनींबद्दल नीट माहिती करून घेतलं आणि गावात मिसळले. मी तिथे गेलो तेव्हा ती वृद्धा महिलाही होती. मधुंनी तिला विचारले, ''या जमिनीची मूळ मालक कोण आहे?'' तिला आनंदाने जोरजोरात हसली.

''ही माझी जमीन आहे,'' संपदाने तिला दिलेल्या आमटी भाताचा घास घेत ती म्हणाली. ती आता इथे येते. आपली जमीन जायला मधु, संपदा जबाबदार नाहीत हे तिला समजलं आहे. गावकऱ्यांनीही त्यांना स्वीकारलं कारण त्यांनी गावाच्या कामांमध्ये सहभाग घेण्याची आणि त्यांच्या अडचणी समजून घेत एकत्र काम करण्याची तयारी दाखवली. माझ्या मते, सारं विसरून एकत्र येण्याचा हाच योग्य मार्ग आहे. गावकऱ्यांना सामावून घेऊन वाटचाल करायला हवी. इथे जमीन खरेदी करणारे नेमकं हेच विसरतात की ते इथे यायच्या आधीपासून हे लोक याठिकाणी राहत आहेत.

शेतीची वेगळी संकल्पना त्यांनी इथे विकसित केली आहे. ऑस्ट्रेलियन ॲकॅसियासारखी निरूपयोगी आणि इथल्या झाडांच्या वाढीला अडथळा आणणारी झाडं ते कापतात. पायऱ्या-पायऱ्यासारखं खणून सुपारीची लागवड केली ती अगदी नदीपर्यंत जाऊन पोचते. जुनी झाडं कापण्यासाठी केलेल्या वाटेवर त्यांनी हळद आणि आलं लावलं. डोंगराच्या टोकावरच्या सपाट जमिनीवर भात आणि डाळी पिकवल्या. अनेक गावकऱ्यांना इथे त्यामुळे रोजगार मिळतो.

पहिल्या वर्षी त्यांनी जुन्या पद्धतींने मातीचे घर बांधले. हे घर त्या गावातील उरलेल्या काही मातीच्या घरांपैकी एक आहे. हे घर जगभरातून येणाऱ्या स्वयंसेवकांना राहण्यासाठी दिले जाते. जेव्हा मी तिथे होतो तेव्हा इटलीची ॲना घर रंगवायला मदत करत होती. ती कोकणातील शिल्पचित्रांवरुन प्रेरणा घेऊन तिचं काम चालू होतं. ऑस्ट्रियाची एलिस भिंती मातीने लिंपत होती. सौदी अरेबियाचा गाझी सुतारकाम व शेतीच्या कामात मदत करत होता तर इस्राएलचा नदाव हळदीतील तण काढण्याचं व भात झोडणीचं काम करत होता. संध्याकाळी हे सर्वजण एकत्र यायचे, त्याच वेळी गावातील काही वयस्कर लोक येऊन त्यांच्याशी चर्चा करायचे.

संपदा संध्याकाळी गावातील मुलांना शिकवते. मधू व संपदाला असं वाटतं की या गावांतील खरी समस्या म्हणजे मूलभूत कौशल्यांची कमतरता. ते मुलांना योग्य व अयोग्य यातील फरक समजावून देण्याचा प्रयत्न करतात. सारासार विचारशक्ती विकसित झाली की मुलांसमोर एक नवीन जग येतं असं ते म्हणतात आणि मलाही हेच खरं वाटतं.

चंद्रप्रकाशात गाझी, नदाव आणि मी भात झोडपणीला गेलो. तिथे ग्रामस्थांनी निसर्ग देवतांना नारळ अर्पण केला. गाणी गायली, नाचत, नाचत भात झोडपला.

लोक विचारतात, ''तुमच्या कल्पनेतला कोकण कसा आहे?'' तर हेच माझं उत्तर आहे! एक कोकण जे जगभरातील लोकांना आपलं मानतं, एक कोकण जे सर्वसमावेशक आणि विविधतेने भरलेलं आहे. एक कोकण ज्याने आपली संस्कृती आणि वारसा जपला आहे आणि जुनं व नवं यांचा सुंदर समन्वय केला आहे. हीच विकासाची संकल्पना आपण संपूर्ण कोकणात वापरली पाहिजे. अशी संकल्पना जी निसर्गाचा आदर करते, लोकांचा सन्मान करते. खरं शिक्षण हा बदल नक्कीच घडवेल अशी आशा वाटते.

शक्य असेल तर नर्गोलीतील संपदा आणि मधू यांच्या शेताला भेट द्या. त्यांच्या शेतातल्या घरात राहा. यामुळे त्यांचा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या चालू ठेवण्यास मदत होईल. माझा विश्वास आहे की यामुळे आजूबाजूच्या गावात सकारात्मक बदल घडू शकेल. तुम्ही त्यांना इतर कोणत्याही प्रकारे मदत करू शकत असाल तर कृपया त्यांच्याशी संपर्क साधा. संपदा आणि मधू यांचा इंस्टाग्राम हँडल -

कोकण किनारपट्टीच्या पायी प्रवासाचे २५ दिवस पूर्ण झाले आहेत. या प्रवासाचा उद्देश म्हणजे स्थानिक समस्या प्रकाशात आणणे, लोकांमध्ये पर्यावरणाची जाणीव जागृत करणे, त्यांचे अनुभव ऐकणे आणि त्यांना एकत्र आणून असं काहीतरी घडवणं जे त्यांच्या भविष्यासाठी उपयुक्त ठरेल आणि त्यांना त्यांच्या भूमीपासून दूर नेण्याऐवजी जवळ ठेवेल.

मदतीसाठी आणि सहभागी होण्यासाठी ह्या क्रमांकावर संपर्क साधा ८९८३७२६७३७

मराठी साहित्यिक दिनविशेष

३० डिसेंबर

१९०१: - वेद, पुराने, ज्योतिषविद्या यांचे अभ्यासक, हिंदुत्ववादी जहाल पत्रकार तसेच भारतीय राजनीति, आंतरराष्ट्रीय राजकारण आणि युद्धशास्त्र या विषयांचे अभ्यासक, केसरीचे व्यासंगी संपादक अनंत जनार्दन करंदीकर यांचा जन्म. त्यांचे लेखन चिकित्सात्मक आणि अभ्यासपूर्ण असे याची प्रचिती लढाऊ राजकारण, गांधी मुस्लिम - गांधी मुस्लिम कॉन्स्पिरसी, दुसरी आघाडी, दुसरे महायुद्ध पूर्वार्ध, क्रांतिकारक टिळक नी त्यांचा काळ तसेच प्राचीन भारतावर आधारित दाशराज्ञ युद्ध, वैदिक आर्यांचे ज्योतिरविज्ञान आणि वैदिक देवतांचे पूनर्दर्शन या ग्रंथातून दिसून येते. **१९२२:** विविध नियतकालिकांतून ४१५ शैक्षणिक लेख, २०७ अध्यात्मिक लेख लिहिणारे लेखक, प्रवचनकार गो. मो. उपाख्य गोपाळ मोरेश्वर कोलते यांचा जन्म. त्यांच्या साहित्यसंपदेत २ गीतसंग्रह, ‘जीवनदर्शन’ हे चरित्र, ‘वागीश्वरी’ हे ओवीबध्द चरित्र तसेच काव्यसंग्रह, लेखसंग्रह आणि ‘जवाहर ज्योत’ हा पं. नेहरु, ‘तपस्या’ हा समर्थ रामदास व शिक्षणयोगी हे कै. वु. दि. ह. सहस्त्रबुध्दे यांच्यावरील विशेषांक हे त्यांचे संपादित ग्रंथ होय. **१९२९:** इतिहास व तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक चिंतामण गंगाधर भानु यांचे निधन. नाना फडणीसांचे वंशज असणाऱ्या चिंतामणरावांनी ‘नाना व महादजी’ यांच्यावर केसरीतून लिहिलेल्या बारा लेखमालेमुळे त्यांचे नाव सर्वत्र झाले. याशिवाय इतिहासकार कसा असावा या संबंधीचे विचार त्यांनी ‘इतिहासकारांचे लक्षणे’ या निबंधातून मांडली. भानू शांकरमतानुयायी होते. वेदांताचा त्यांनी अभ्यास केला होता. ‘भगवद्‌गीता’ या मासिकातून भाषांतर, अन्वयार्थ, शांकरभाष्य यासहित गीता वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला. तसेच दहा उपनिषदांची शांकरभाष्यासहित भाषांतरे केली. भाषांतरीत चतु:सूत्री, स्पेन्सरच्या पुस्तकांचे ‘नीतिशास्त्रांची मुलतत्त्वे आणि नीतिमीमांसा न्यायतत्त्वे’ या नावाने अनुवाद कॉब्डेन व डिमास्थेनीस यांच्या चरित्रासह ‘शृंगेरीची लक्ष्मी’ ही ऐतिहासिक आणि ‘हंबीरराव’ ही लघु कादंबरी त्यांच्या नावावर आढळते. **१९३२ :** - मध्ययुगीन इतिहासतज्ञ म्हणून प्रसिध्द असलेले लेखक डॉ. कृष्णाजी नागेशराव चिटणीस यांचा जन्म. ह्यांचे ‘मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था खंड १ ते ४’ प्रकाशित झाले आहेत. **१९५१:-** कवी वसंत सदाशिव बल्लाळ यांचे निधन. ‘स्नेहदीप’ हा त्यांचा स्फुट काव्यसंग्रह असून ‘शशिकला’ हे त्यांचे खंडकाव्य प्रसिध्द. ‘निरंजन’ या टोपण नावाने त्यांनी चाळीस एक कथा आणि दीडदोनशे स्फूट कविता लिहिल्यात. **१९६९ :-** कवी रामप्रभू सोमाजी गंरमडे यांचा जन्म. ह्यांच्या नावावर ‘तनकोंडी’ व ‘फुंकर’ हे काव्यसंग्रह आहेत. **१९७५:-** महाराष्ट्राच्या राजकारणातील एक बलाढ्य व्यक्तिमत्व, गांधीवादी विचारवंत, स्वातंत्र्य सेनानी, लेखक शंकरराव दत्तात्रय देव यांचे निधन. स्वराज्य, लोकशक्ती यासारखी वृत्तपत्रे त्यांनी चालविली- उपनिषदत्सार, भगवान बुद्धासाठी यासारखे पुस्तके लिहिली. मैत्रीयात्रा गांधीजींचे आत्मचरित्र आणि दैव देतो पण कर्म नेते हे स्वतःचे आत्मचरित्र अशी साहित्य संपदा. **२०१५ :** ‘आनंदयात्री’ कवी मंगेश पाडगावकर अनंतात विलीन. आनंद यात्री कवी मंगेश पाडगावकर यांचे निधन. वृत्तबद्ध रचना, शब्दप्रभुत्व, गेयता ही त्यांच्या काव्याची वैशिष्ट्य. त्यांचे धारानृत्य, जिप्सी, छोरी, उत्सव, विदूषक, सलाम, गझल, भटकेपक्षी बोलगाणी हे काव्यसंग्रह, संत मीराबाई, संत कबीर आणि संत तुलसीदास यांच्या काव्याचे भावा भावानुवाद; बोरकरांची कविता व संहिता ही महत्वपूर्ण संपादने; निंबोणीच्या झाडामागे हा ललित निबंध संग्रह; भोलानाथ, बबलगम, चांदोमामा हे बालगीत संग्रह. अशी साहित्य संपदा. वात्रटिका हा संग्रह त्यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचा आणखीन एक पैलू दाखवणारा आहे.

- संजय वझरेकर
९९७५५७६६७५

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३० डिसेंबर

१) श्री. विश्वनाथ दादू राणे
आवास, अलिबाग,
३०-१२-१९४४

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वाढदिवस साजरा करा
अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

कै वासंती नाना झाडेकर, पुण्यतिथी, रामनाथ, अलिबाग

सरते वर्ष लोकशाहीला खड्ड्यात घालणारे

खासदार संजय राऊत यांची मोदी-शहांवर टिका

। मुंबई । प्रतिनिधी ।

सरते २०२४ वर्ष हे लोकशाही आणि स्वातंत्र्याला खड्ड्यात घालणारे म्हणून लक्षात राहील. आर्थिक प्रगतीची घसरण या वर्षात झाली आहे. धर्मातील लोकशाही की धर्मप्रधान हुकूमशाही यांचा तुंबळ संग्राम देशात सुरु असल्याची टीका शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे खा. संजय राऊत यांनी केली आहे. त्यासोबतच २०२५ला सत्य विजयाची पहाट उगवेल, असा विश्वास देखील संजय राऊत यांनी व्यक्त केला आहे.

संजय राऊत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहांवर हल्लाबोल केला आहे. सरते वर्ष २०२४ हे लोकशाही आणि स्वातंत्र्याला खड्डयात घालणारे वर्ष म्हणून दीर्घकाळ लक्षात राहील असे संजय राऊत यांनी म्हटले आहे. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रात आणि दिल्लीत पुन्हा मोदी-शहांची जोडी सत्तेवर आली, मात्र त्यामुळे खोटेपणास प्रतिष्ठा मिळाली. 'सत्यमेव जयते' हा भारतीय संविधानाचा नारा पूर्णपणे संपला. सुप्रीम कोर्ट निवडणूक आयोग, राज्यपाल, लोकपाल या घटनात्मक संस्थांचा कणाच जणू काढून घेतला व बिनकण्याच्या संस्था सत्ताधाऱ्यांच्या आश्रितांप्रमाणे गुजराण करीत असल्याचे चित्र २०२४ ने पाहिले असल्याची खरमरीत टीका संजय राऊत यांनी केली आहे.

अधर्माचे राज्य २०२५ ला संपेल

लोकशाही आणि स्वातंत्र्याला खड्ड्यात घालणारे वर्ष म्हणून २०२४ ची नोंद केली जाईल. निवडणूक आयोग, सुप्रीम कोर्टावर ताबा मिळवून निवडणुका जिंकणाऱ्यांचे राज्य हा अधर्म आहे. त्या अधर्माचे राज्य २०२५ ला संपेल. लोकशाही मार्गाने अधर्माचा पराभव होणे कठीण, परंतु मोदी-शहांच्या कुंडलीतील राजयोग अस्तंगत होताना दिसतोय, असे भाकित शिवसेना ठाकरे गटाने वर्तवले आहे. २०२५ ला सत्य विजयाची पहाट उगवेल, असा विश्वास संजय राऊत यांनी व्यक्त केला आहे.

अर्थव्यवस्था आजारी आणि पंगू

संजय राऊत यांनी देशातली स्वायत्त संस्था आश्रित झाली असल्याची टीका केली आहे. त्यासोबतच देशाच्या आर्थिक स्थितीवरही भाष्य केले आहे. त्यांनी म्हटले की, मोदी राजवटीत देशाच्या प्रगतीची घसरण झाली, मात्र नैतिकतेची घसरण सर्वात जास्त झाली. भारताची आर्थिक स्थिती साफ खालावली आहे. मोदी यांनी सांगितले होते, भारताला ५ ट्रिलियनची जगातली तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनवू, परंतु जागतिक बँकेने मोदींना खोटे पाडले. भारत एक आजारी, पंगू अर्थव्यवस्था बनली असून घोटाळे व लबाड्या वाढल्या आहेत. हे जागतिक बँकेच मत आहे

आळंदी येथे पर्यावरण संमेलन संपन्न

।चिपळूण/आळंदी।प्रतिनिधी।

संत ज्ञानेश्वरांनी, एका ठिकाणी 'नरगेचि रचावी, जळाशये निर्मावी महावने लावावी, नानाविधे।' असे म्हटले आहे. यातील 'नानाविध' हा शब्द माऊलींनी पर्यावरणाचा विचार करता अतिशय सूचक वापरला आहे. एकाच प्रकारच्या झाडांच्या बागा लावल्या आणि ती झाडे संभाव्य रोगाला प्रतिकार करणारी नसली तर ती सर्वच्या सर्व कीडग्रस्त होतात. वेगवगळ्या प्रकारच्या झाडांमधील अशी प्रतिकार शक्ती ही वेगवेगळी असते. तेंव्हा कीड किंवा रोग पडला तरी सगळी झाडे नष्ट पाहू नयेत, या मागील माऊलींचा दृष्टीकोन संभवतो. कोणत्याही सामाजिक क्षेत्रात वावरण्यासाठी मनुष्यामध्ये एक विशिष्ट स्वभाव असावा लागतो. सध्याच्या जगासमोरील पर्यावरणीय संकट दूर सारण्यासाठी पर्यावरण जनजागरण-संवर्धन वर्तन हाही मानवी स्वभाव आणि संस्कार बनायला हवा आहे, असे मत पर्यावरण-पर्यटन क्षेत्रातील कार्यकर्ते धीरज वाटेकर यांनी व्यक्त केले आहे.

ज्येष्ठ वनस्पती शास्त्रज्ञ प्रा. श्री. द. महाजन यांच्या अध्यक्षतेखाली निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ (एन.जी.ओ.) आयोजित आठवे पर्यावरण संमेलन नुकतेच आळंदी येथे संपन्न झाले. यावेळी वाटेकर बोलत होते.

संमेलनाध्यक्ष महाजन यांनी दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थितांशी संवाद साधला. आयोजक संस्था ही प्रमुख पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहे. आळंदीतील देविदास धर्मशाळा तथा वै. मामासाहेब दांडेकर स्मृती मंदिर येथे रविवार (दि.२९) संपन्न झालेल्या एकदिवसीय संमेलनप्रसंगी संमेलनाचे उद्घाटन श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदीचे प्रमुख विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद मोघे, माजी आरोग्य अधिकारी ॲड. प्रभाकर तावरे, निरंजनशास्त्री कोठेकर, प्रमोद मोरे यांच्या उपस्थित पार पडले.

आदित्य ठाकरेंनी सरकारला फटकारले

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबईतगेल्याकाहीदिवसांपासून मोठ्या प्रमाणात प्रदूषण वाढले आहे. पाणीपुरवठ्याचा प्रश्न जनतेला भेडसावत आहे. अशा अनेक समस्यांना सध्या मुंबईकर सामोरे जात आहे. त्यावरून शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे आ. आदित्य ठाकरे यांनी सरकारवर टीका करत त्यांना फटकारले आहे. गेल्या काही दिवसांपासून मुंबईवर धुरक्याची जाड चादर पसरलेली आहे. तसेच, कोणताही ठोस प्लान नसताना मुंबईत अनेक ठिकाणी रस्ते खोदून ठेवले आहेत, त्यावरही सरकारकडून कोणतेही उत्तर मिळत नाही. मग हे सरकार आहे कुठे? नक्की कशात व्यस्त आहे? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी केला आहे.

दांपत्याला जिवंत जाळण्याचा प्रयत्न

। कल्याण । प्रतिनिधी ।

पती व पत्नीला जिवंत जाळण्यासाठी घरावर पेट्रोल ओतून घराला आग लावल्याचा प्रकार भिवंडीतील निजामपुरा परिसरातील कुरेशीनगरमध्ये घडला आहे. या आगीत दोघेही पती-पत्नी जखमी झाले असून त्यांना इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मारेकऱ्यांनी घराला आग लावण्यापूर्वी दरवाजाची कडी बाहेरून लावून घेतली. आग निदर्शनास आल्यानंतर या पती-पत्नीने आरडाओरड केली. त्यामुळे शेजारी मदतीला आल्याने मोठा अनर्थ टळला, अन्यथा घरातील गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन या वस्तीत मोठा आगडोंब उसळला असता.

आसिफ आणि फरीन कुरेशी या पती-पत्नीच्या घरावर मारेकऱ्यांनी मध्यरात्री पेट्रोल टाकून आग लावली. त्यानंतर मारेकऱ्यांनी दरवाजाची बाहेरून कडी लावली आणि ते पळून गेले. आग भडकल्यानंतर घरात धूर जमा झाल्याने झोपेत असलेले दोघे पती-पत्नी जागे झाले. त्या दोघांनी दरवाजाने बाहेर पडण्याचा प्रयत्न केला. मात्र, दरवाजा बाहेरून बंद असल्याने दोघांनीही आरडाओरड केली. त्यामुळे शेजारी जागे झाले. त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझविली. या आगीत आसिफ आणि फरीन जखमी झाले. शेजाऱ्यांनी त्यांना इंदिरा गांधी स्मृती शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. याप्रकरणी निजामपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

आदिवासी मातेचा अतिरक्तस्त्रावाने मृत्यू

। पालघर । प्रतिनिधी ।

प्रसूतीनंतर अतिरक्तस्त्राव झाल्याने आदिवासी मातेचा तीन रुग्णालयांमध्ये फरफट होऊन रस्त्यातच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. मोखाड्यापासून १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या कोलद्याचा पाडा येथे राहणारी आशा भुसारे (२२) असे तिचे नाव आहे. या घटनेत नवजात बाळ बचावले आहे. डॉक्टरांनी दुर्लक्ष केल्यामुळेच मातेचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला असून दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. आशा भुसारे ही महिला २५ डिसेंबर रोजी प्रसूतीसाठी मोखाडा ग्रामीण रुग्णालयात दाखल झाली. दिवसभर तिच्यावर कोणतेही उपचार करण्यात आले नाहीत. दुसऱ्या दिवशी २६ डिसेंबरला तिची प्रसूती होऊन तिने एका बालकाला जन्म दिला. त्यानंतर काही वेळाने मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव सुरू झाल्याने आशा हिला प्रचंड वेदना होऊ लागल्या. त्यामुळे तिला पुढील उपचारासाठी जव्हारच्या उपजिल्हा रुग्णालयात पाठवले. तिथे तिला रक्ताच्या चार बाटल्यादेखील दिल्या. तरीही रक्तस्त्राव थांबला नाही. आशा भुसारे हिला वेदना असह्य होऊ लागल्याने डॉक्टरांनी नाशिकच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात पाठवण्याचा सल्ला दिला. त्यानुसार नाशिकला घेऊन जात असताना रस्त्यामध्ये तिचा दुर्दैवी मृत्यू झाला.

शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांची दादागिरी

कांदिवलीतील अभियंत्यांना खंडणीसाठी धमकी

। मुंबई । प्रतिनिधी ।

शिंदे गटाच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांची कांदिवली पश्चिमेला दादागिरी सुरू आहे. सत्तेचा माज आलेल्या त्या पदाधिकाऱ्यांनी रस्त्याचे काम करणाऱ्या अभियंत्यांना पाच लाखांच्या खंडणीसाठी धमकावून त्यांना बांबू व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी कांदिवली पोलीस ठाण्यात मस्तवाल पदाधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सिव्हिल इंजिनीयर आशीष मल्हा (२९) यांच्या तक्रारीवरून लालसिंग राजपुरोहित, गणेश पवार, पिंटो जयस्वाल, विकास गुप्ता, नीलेश जयस्वाल आणि सुरेश शहा या मस्तवाल पदाधिकाऱ्यांविरोधातखंडणीसाठी धमकावून अभियंत्यांना जबर मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मल्हा हे बी.एस.सी.पी.एल इन्फ्रास्ट्रक्चर लि. कंपनीत सिव्हिल इंजिनीयर म्हणून काम करतात. या कंपनीला कांदिवली येथील आर वॉर्डमधील रस्त्याच्या कॉंक्रिटायझेशनच्या कामाची वर्कऑर्डर मिळाली आहे.

कांदिवली पोलीस ठाणे, मुंबई

गेल्या तीन महिन्यांपासून इराणी वाडी रस्ता क्रमांक ३ येथील रस्त्याच्या नूतनीकरणाचे काम सुरू आहे. शुक्रवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास लालसिंग राजपुरोहित, गणेश पवार या दोघांनी मिळून रस्त्याचे कामकाज सुरू ठेवण्याकरिता पाच लाख रुपयांची खंडणी मागितली. पण खंडणी दिली नाही म्हणून इराणी वाडी क्रमांक ३ येथील दत्तानी मार्गावर असलेल्या राजपुरोहित याच्या कार्यालयात बोलावून घेतले. पैसे देण्यास नकार देताच राजपुरोहित, गणेश पवार, पिंटो जयस्वाल व अन्य १० ते १५ जणांनी मिळून मला व अभियंता विश्वनाथ चौरसिया, विनीत ओम प्रकाश सिंग यांना कार्यालयाबाहेर नेऊन शिवीगाळ करत बांबू तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच तेथे खोदलेल्या खड्ड्यात ढकलले. अशा प्रकारे हे लोक वारंवार त्रास देत असल्याचे आशीष मल्हा यांनी त्यांच्या तक्रारीत म्हटले आहे.

आव्हाडांची खोटी व्हॉट्सअप चॅट व्हायरल

रूपाली ठोंबरे यांच्यावर गुन्हा दाखल

। मुंबई । प्रतिनिधी ।

बीडमधील मोर्चानंतर अजित पवार गटाच्या नेत्या रुपाली ठोंबरे यांनी जितेंद्र आव्हाड यांच्या व्हॉट्सअप चॅटचा एक स्क्रीनशॉट सोशल मीडियावर पोस्ट केला होता. मात्र, तो स्क्रीनशॉट खोटा असल्याचे सांगितले जाते आहे. दरम्यान, याप्रकरणी रुपाली ठोंबरे यांच्यासह सात जणांविरोधात गुन्हाही दाखल करण्यात आला आहे.

जितेंद्र आव्हाड यांनी स्वतः एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत यासंदर्भात माहिती दिली आहे. ते म्हणाले की, माझ्या खोट्या व्हॉटसॲप चॅटचा स्क्रीनशॉट वायरल करणाऱ्यांविरुद्ध शनिवारी मी बीडमधील शिवाजी नगर पोलीस ठाण्यात रितसर गुन्हा (एफआयआर) दाखल केला आहे. कर नाही तर डर कशाला? असे जितेंद्र आव्हाड यांनी पोस्टमध्ये सांगितले आहे. दरम्यान, शनिवारी जितेंद्र आव्हाड यांच्या संदर्भातील वादग्रस्त चॅट रुपाली ठोंबरे यांनी शेअर केले होते. 'उद्याचा मसाला तयार ठेव शिवराज.. मी पहिली तुझी भेट घेईन, त्यानंतर मोर्चाकडे... मुंडेंविरोधात आणि वाल्याविरोधात (वाल्मिक कराड) जे जे असेल ते सर्व गोळा कर पैसे लागले तर मला फोन कर, पण मटेरियल तयार ठेव... तुझा फोन लागत नाहीये सकाळपासून प्रयत्न करतोय. हे चॅट जितेंद्र आव्हाडांच्या नावाने व्हायरल करण्यात आले होते.

तसेच, मोर्चात मुस्लिम आणि दलितांनाही गोळा करता आलं तर करा, पैशांची काळजी करु नका... आंबेडकरी चळवळीतील दीपक केदार म्हणून माझा माणूस आहे, त्याला ही संधी द्यावी, मी सांगितले आहे, कसे काय कुणावर बोलायचे.. कसा मंत्री राहतो आणि अजित (अजित पवार) याला कसा पक्षात ठेवतो ते बघू आता.' असंही या चॅटमध्ये म्हटले होते. हे चॅट व्हायरल झाल्यानंतर जितेंद्र आव्हाड यांनीही हे चॅट खोटे असल्याची प्रतिक्रिया दिली होती.

या संदर्भात रूपाली ठोंबरेसह विक्रांत फड, रेखा फड, कृष्णा धानोरकर, बिभीषण अघाव, आकाश चौरे आणि सौरभ आघाव यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मध्यवर्ती रुग्णालय मेणबत्तीच्या उजेडात

जनरेटरअभावी रुग्णांना अंधारात उपचार

। ठाणे । प्रतिनिधी ।

उल्हासनगर शहरात नियोजित विकासकामांसाठी कोट्यवधी रुपयांची तरतूद करण्यात आली असून काही कामे प्रगतीपथावर आहेत. दुर्दैवाने येथील लाखो नागरिकांचा जिव्हाळ्याचा विषय असलेल्या मध्यवर्ती रुग्णालयात मात्र कधी कधी पाच-पाच तास मेणबत्तीच्या उजेडात रुग्णांवर उपचार करण्याची पाळी येते. शुक्रवारी एकीकडे वीज खंडित झाली तर दुसरीकडे जनरेटर पुरेसे नसल्याने डॉक्टर आणि रुग्णांना अंधारात चाचपडण्याची वेळ आली.

महावितरणकडून शुक्रवारी शटडाऊन घेतला जातो. त्यामुळे यापूर्वी देखील रुग्णालय अंधारात गेल्याच्या घटना घडल्या आहेत. चार महिन्यांपूर्वी देखील रुग्णालयात तब्बल दोन दिवस वीज पुरवठा खंडित झाला होता. तेव्हा सुद्धा रुग्णांचे असेच हाल झाले होते. वारंवार जिल्हा रुग्णालयात वीज जात असल्याने त्यावर ठोस उपाययोजना करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

या संदर्भात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. मनोहर बनसोडे यांच्याकडे विचारणा केली असता ते म्हणाले, महावितरणचे शटडाऊन आणि काही जनरेटरच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आल्याने रुग्णालयातील ठराविक भाग हा अंधारात होता. मात्र, महत्वाच्या वॉर्डात मोजकेच जनरेटर असल्याने त्या ठिकाणी उजेडात कामकाज झाले. इमर्जन्सी ऑपरेशनची वेळ आल्यास रुग्णाला कॅम्प नंबर ४ मधील शासकीय रुग्णालयात नेऊन ऑपरेशन करण्याची तयारी ठेवण्यात आली होती, अशी माहिती डॉ. बनसोडे यांनी दिली.

दमानीया यांचे ठिय्या आंदोलन

। बीड । प्रतिनिधी ।

सरपंच संतोष देशमुख यांच्या झालेल्या निर्घृण हत्या करणारे आरोपी अजूनही फरार आहेत. यामधील संशयित वाल्मीक कराडला जोपर्यंत अटक होत नाही आणि मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा जोपर्यंत घेतला जात नाही तोपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरूच राहणार असल्याचे सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानीया यांनी सांगितले आहे.

अंजली दमानीया यांनी रविवार २९ डिसेंबरपासून आपल्या ठिय्या आंदोलनाला सुरुवात केली आहे. यावेळी, दमानिया यांनी म्हटले की, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांचा अत्यंत निर्दयपणे झालेल्या हत्याकांड मागील संशयित आरोपी वाल्मीक कराड याला अटक करावी, तसेच मुख्यमंत्री फडणवीसांनी मंत्री धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा. या प्रमुख मागण्या मान्य होईपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन सुरूच राहणार असल्याचे देखील त्यांनी सांगितले आहे. यामधून संतोष देशमुख यांना न्याय मिळावा व बीडच्या जनतेतील दहशत नाहीशी करावी एव्हढाच उद्देश आहे. तसेच, राजकीय वरदहस्त असलेला हत्येमागील आरोपी वाल्मीक कराड २० दिवस उलटूनही मोकाटपणे बाहेर फिरतो आहे. तरी, त्याला अटक करून चौकशी करून त्याच्यावर व त्यात सामील असलेल्या इतर लोकांवर कायदेशीर कारवाई व्हायला हवी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

श्रमदानातुन बांधले २ हजार बंधारे

रत्नागिरी : 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेतून जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत दरवर्षी बंधारे उभारले जातात. यंदाही श्रमदानातून २ हजार ४९१ बंधारे बांधण्यात आले आहेत. उशिरापर्यंत पाऊस पडल्याने बंधारे बांधण्याचे काम काहीसे लांबणीवर पडले. त्यामुळे जिल्ह्यात यंदा पाणीटंचाईही लांबण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. जिल्ह्यासाठी ८ हजार ६६५ बंधाऱ्यांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

गणपतीपुळे सरपंच, ग्रामसेवकाच्या मनमानीची हद्द

पर्यटकांचे जीव वाचवणाऱ्यावर उपोषणाची वेळ

। रत्नागिरी । प्रतिनिधी ।

रत्नागिरी तालुक्यातील गणपतीपुळे येथिल नारळ पाणी विक्रेते शरद मयेकर त्यांच्या पत्नीसह शुक्रवारी (दि.२७) सकाळी दहा वाजल्यापासून आमरण उपोषणाला बसले आहेत. समुद्रकिनारी पती पत्नीच्या नारळ पाणी, भेळपुरी विक्रीच्या व्यवसायाला सरपंच आणि ग्रामसेवक हे व्यवसाय करण्यास मनाई करत असल्यामुळे मयेकर दाम्पत्यांने उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. उपोषणाला बसण्यापूर्वी प्रशासनाला दिलेल्या पत्रकाद्वारे त्यांनी गणपतीपुळे ग्रामपंचायतचा मनमानी कारभार कशा पद्धतीने सुरू आहे हे देखील समोर आणले आहे. तरीही जिल्हा प्रशासन सुस्त असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

मालगुंड येथील शरद अशोक मयेकर हे सुमारे २० वर्षापासून गणपतीपुळे समुद्रकिनारी नारळ पाणी विक्रीचा व्यवसाय करीत आहेत. मात्र, हा व्यवसाय करण्यास गणपतीपुळे ग्रामपंचायतीने मनाई केल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. ग्रामपंचायतीने कोणत्या आधारे व्यवसाय नाकारला याबाबत कोणतीही माहिती दिलेली नाही. तसेच, शरद यांनी वेळोवेळी ग्रामपंचायतला कर देखील भरला आहे. तरी, दि. २ डिसेंबर रोजी त्यांची पत्नी आदिती ही व्यवसाय चालवण्याची परवानगी मागण्याकरिता गेली असता सरपंच व ग्रामसेवक यांनी तिला उडवा-उडवीची उत्तरे दिली आहेत.

गणपतीपुळे ग्रामपंचायत
सरपंच व ग्रामसेवक यांच्या-
मनमानी कारभारा विरोधात-
आमरण उपोषण
दि.२७-१२-२०२४पासून सुरू
श्री. शरद मयेकर
सौ. आदिती शरद मयेकर

तात्काळ कारवाईसह बदलीची मागणी

गणपतीपुळे ग्रामपंचायतीकडून होणाऱ्या जाणीवपूर्वक त्रासाबद्दल ग्रामसेवक चौधरी व सरपंच कल्पना पकले हे पैशाची मागणी करत असल्यामुळे आता जगणे मुश्किल झाले आहे. तरी, सरपंच व ग्रामसेवक यांच्यावर तात्काळ कारवाई होऊन ग्रामसेवकांची बदली व्हावी. अशी थेट मागणी प्रशासनाकडे लेखी पत्रकातून करण्यात आली आहे. यासोबत, गणपतीपुळे ग्रामपंचायत यांच्यावर यापूर्वी मालगुंड येथील रहिवासी प्रनेश मयेकर यांनी न्यायालयात केस दाखल केलेली आहे.

अनेकांचे वाचवलेत प्राण

गणपतीपुळे येथे येणारे भाविक समुद्रात पोहण्यासाठी जात असतात. मात्र, पर्यटकांना समुद्राच्या पाण्याचा अंदाज येत नसल्याने बुडण्याचे प्रसंग यापूर्वी अनेक वेळेला घडले आहेत. परंतु, उपोषणकर्ते मयेकर यांनी आपल्या जीवाची पर्वा न करता अनेकांचे प्राण वाचविले आहे. आजपर्यंत त्यांनी सुमारे ३९ पर्यटकांचे प्राण वाचविले आहेत. या कौतुकास्पद काम गिरीचे जिल्हा दंडाधिकारी साहेब रत्नागिरी व जिल्हा पोलीस प्रशासन रत्नागिरी यांच्याकडून सन्मानचिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले आहे.

बंदुका झळकवणाऱ्यांवर कारवाईचे आदेश

। मुंबई । प्रतिनिधी ।

बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने राजकारणाचे गुन्हेगारीकरण चव्हाट्यावर आले आहे. महायुतीचे सरकार स्थापन झाल्याबरोबर ही घटना घडली आहे. यामध्ये फडणवीस सरकारमधील मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर चौफेर हल्लाबोल होत आहे. तर, बीडमध्ये सर्वाधिक शस्त्र परवाने देण्यात आल्याचाही आरोप झाला आहे. विना परवाना शस्त्र हवेत झळकावत फायरिंगचे व्हिडिओ आणि रिल्स सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या सर्वांवर कारवाईचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

बीडमधील घटनांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे लक्ष ठेवून आहेत. बीड जिल्ह्यात १ हजार २२२ शस्त्र परवाने आहेत. याशिवाय बेकायदा शस्त्र बाळगणाऱ्यांची संख्या वेगळी असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला. दमानिया यांनी विना परवाना शस्त्र बाळगणाऱ्यांचे व्हिडिओ बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांना पाठवले होते. त्यानंतर दोन जणांवर कारवाई करत त्यांना अटक देखील झाली. दरम्यान, दोन दिवसांत त्यांना जामीनही मंजूर झाला.

आधी धरणाचे पाणी विकले, आता श्रीमंतांचे चोचले पुरविण्यासाठी बोटिंग

पाली-भूतीवली धरण म्हणजे सोन्याचे अंडे ?

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील रेल्वे पट्टा हिरवागार होण्यासाठी दोन गावांचे स्थलांतरण करून पाली भूतीवली हा लघुपाटबंधारे प्रकल्प उभारण्यात आला. या धरणातून आजूबाजूच्या २० गावातील ११०० हेकटर जमीन ओलिताखाली येणार होती. मात्र, शेतीसाठी पाणी देण्यासाठी कालवे बांधण्यात आले नसल्याने धरणातील पाणी सरकारने एका बिल्डरला विकले आणि आता त्या धरणात श्रीमंतांचे चोचले पुरविण्यासाठी थेट बोटिंग करण्यास परवानगी देण्यात आली आहे. दरम्यान, पाली भूतीवली धरण हे सरकारला सोन्याची अंडी देणारी कोंबडी वाटली काय? असा संतप्त सवाल प्रकल्पग्रस्त आणि बाधित शेतकरी यांच्याकडून उपस्थित केला गेला आहे.



पाली भूतीवली धरणातील पाणी धरणाच्या जलाशयात पाईप टाकून ओढले जात असून, पाटबंधारे खाते मूग गिळून गप्प आहे. धरणातील पाणी शेतीसाठी असताना बिल्डरसाठी धरणातील पाणी विकण्यात आले असून, आता त्याच पाली भूतीवली धरणातील डेड वॉटर वर श्रीमंतांचे चोचले पुरविण्यासाठी बोटिंग चे नावाखाली परवाना देण्यात आला आहे.धरणात बोटिंगसाठी तीन संस्थांनी पाटबंधारे विभागाकडे नौका विहार करण्यासाठी परवानगी मागितली होती. त्यातील एका संस्थेला कोकण पाटबंधारे विकास महामंडळाच्या ठाणे विभागीय कार्यालयाने ही परवानगी १९ डिसेंबर २०२४ रोजी दिली आहे. त्यामुळे श्रीमंतांसाठी स्पीड बोटीतून नौकावाहन करण्यासाठी पाली भूतीवली धरण सज्ज झाले आहे. त्या नौका विहाराचा परिणाम भातशेती करण्यासाठी उत्सुक असलेल्या शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी मिळणार नसल्याने शेती आणि तत्सम व्यवसायांना खीळ बसून शेतकऱ्यांची आर्थिक प्रगतीदेखील खुंटणार आहे.

पाच वर्षांचा करार

सदर संस्थेला पाली भूतीवली धरणात नौका विहार करण्यासाठी पाच वर्षांचा करार केला आहे. त्या काळात केवळ प्रत्येक वर्षी १५ टक्के वाढ केली जाणार आहे. २०२९ मध्ये भाडेपट्टा हा तीन लाख २४ हजार एवढा असणार आहे.

जलाशयातील माशांना धोका

धरणातील जलाशयात असलेल्या माशांना मोठा धोका निर्माण झाला आहे. धरणातील मासे हे आकाराने खूप मोठे असल्याचे पावसाळ्यात धरण ओव्हरफ्लो झाल्यानंतर दिसून येते. त्यामुळे एखाद्या स्पीड बोटीला धरणातील मोठ्या माशाने धडक दिल्यास स्पीड बोट पलटी होऊन मोठा अपघात होण्याची शकयता निर्माण झाली आहे. धरणातील माशांना धोका निर्माण झाल्यास पिसाळलेले मासे हायस्पीड बोटींना धडक देऊ शकतात, अशी शक्यता शेतकरी वर्तवित आहेत.

साडेपंधरा लाख अनामत, अडीच लाख भाड्यासाठी सरकार नमले

पाली भूतीवली धरणाचे पाणी दोन लाखांच्या पाणीपट्टीवर वर्षासाठी याआधी विकण्यात आले आहे, त्यानंतर आता धरणाचे मुख्य जलाशयातील पाण्यावर आता नौका विहार केला जाणार आहे. त्यासाठी पाटबंधारे निविदा मंजुरी केलेल्या संस्थेला वर्षाला फक्त दोन लाख ४५ हजार ५०० रुपये भरावे भाड्यापोटी भरावे लागणार आहेत. तर संबंधित नौका विहाराचा ठेका मिळविण्यासाठी पाटबंधारे विभागाच्या विभागीय कार्यलयाने केवळ १५ लाख ५८ हजारांची अनामत रक्कम बँक गॅरंटी म्हणून वसूल केली आहे.

बिल्डरसाठी ‘पाटबंधारे’च्या पायघड्या

शासनाने आपल्या पाटबंधारे खात्याची अखत्यारीत असलेल्या धरणातील पाणी एका बिल्डरला विकले आहे. त्या पाण्यावर स्थानिकांनाच अधिकार असताना स्थानिकांना धरणाचे पाणी वाहून जात असलेल्या नाल्यावर विहीर खोदून पाणी उचलून पाणीपुरवठा योजना राबवावी लागते. मात्र, तेथील बिल्डरसाठी पाटबंधारे खात्याने पायघड्या घातल्या असून, धरणाच्या जलाशयात पाईप टाकून पाणी उचलण्याची परवानगी दिल्याने शासनाची वाटचाल कुठे चालली आहे, असा सवाल स्थानिक शेतकरी विचारात आहेत.

> आमच्या वरिष्ठ कार्यालयाने पाली भूतीवली धरणात नौका विहार करण्यासाठी परवानगी दिली आहे, हे खरे आहे.
> – श्री. शिंदे, उपअभियंता
> पाटबंधारे विभाग कर्जत

> आम्ही स्थानिक शेतकरी हे गेली २० वर्षे धरणाचे पाणी शेतीसाठी येईल म्हणून शेती सांभाळून आहेत. शेतीसाठी पाणी येणार म्हणून प्रकल्पग्रस्त समिती ३० वर्षांपासून भांडत होती. समितीचे अध्यक्ष सरपंच जवाहर देशमुख तसेच अन्य अन्य कार्यकर्ते आज या जगात नाहीत.त्यामुळे शासनाने आमच्या शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळू नये आणि शेतीसाठी पाणी देण्यासाठी आधी कालवे खोदण्याची कामे हाती घ्यावीत. शेतीसाठी पाणी मिळावे यासाठी परिसरातील सहा ग्रामपंचायती यांनी आपले ठराव शासनासाठी यावर्षीदेखील दिले आहेत.
> – सचिन गायकवाड,
> शेतकरी, आसल

रिलायन्सविरोधात प्रकल्पग्रस्त आक्रमक

। शिहू । वार्ताहर ।

भूमीपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्था चोळे ते नागोठणे प्रकल्पग्रस्त प्राधान्य प्रमाणपत्रधारकांनी रिलायन्स कंपनीविरोधात पुन्हा दंड थोपटले असून, दि. १ जानेवारीपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी मात्र जीव गेला तरी न्याय्य हक्क घेतल्याशिवाय उपोषणाला स्थगिती देणार नाही, असा निर्धार नोकरीपासून वंचित प्रकल्पग्रस्तांनी केला आहे.

■ न्याय मिळाल्याशिवाय मागे हटणार नाही
■ १ जानेवारीपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा

प्रकल्पग्रस्तांच्या न्यायासंदर्भात मागिल काही वर्षांपासून विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात आणि मार्गदर्शनात हा लढा सुरु आहे. संघर्षात प्रत्येक स्थरावर प्रकल्पग्रस्तांनी स्वतःला न्यायाच्या बाजूने सिद्ध केले आहे. प्रशासनाने वंचित प्रमाणपत्रधारकांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी केली आहे. जिल्हाधिकारी रायगड यांनी पडताळणी केलेल्या प्रमाणपत्रधारकांची यादी निर्णायक न्यायाकरिता मंत्रालयात उद्योग विभाग येथे पाठवली आहे. जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रस्तावावर उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे यांनी ही फाईल तयार केली असून, ती प्रकल्यग्रस्तांच्या संबंधित प्रकरणी संलग्न असलेल्या प्रत्येक विभागाकडे सहमतीकरिता पाठवली होती. शेवटी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या अंतिम सहमतीस गेली होती. उद्योगमंत्री आणि रायगडचे पालकमंत्री यांनी फाईलवर अंतिम निर्णायक संयुक्त बैठक घेण्याचे शेरा मारला आहे. परंतु, आजतागयात निर्णायक संयुक्त बैठक झालेली नाही. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांचा न्याय आजवर प्रलंबित राहिलेला आहे.

प्रशासकीय स्तरावरुन निर्णायक भूमिका घेण्यास विलंब झाल्यास सर्व प्रमाणपत्रधारक आपल्या सहकुटुंबासहित अंतिम निर्णायक लढा देण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील हिराकोट तलावाशेजारी दि. १ जानेवारीपासून बेमुदत उपोषण करणार आहेत. यावेळी प्रकल्पग्रस्त आपला न्याय्य हक्क घेतल्याशिवाय उपोषण स्थगित करनार नाही, असा निर्धार प्रकल्पग्रस्तांनी केला आहे.

विद्यार्थ्यांना मायेची ऊब

। महाड । वार्ताहर ।

गेल्या काही दिवसा बोचऱ्या थंडीची चाहूल सुरू असून, सकाळच्या पहारी शाळेला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा थंडीपासून बचाव व्हावा यासाठी पुणे येथील आरहम सेवा युवा ग्रुप पुणेतर्फे रेवतळे केंद्रातील विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप करत नवा आदर्श सर्वांसमोर ठेवला आहे

दि. २६ डिसेंबर रोजी रेवतळे केंद्रातील सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना स्वेटरचे वाटप करण्यात आले. यावेळी शाळा मुमुर्शी येथे आरहम

थंडीपासून बचावासाठी स्वेटरचे वाटप

सेवा युवा ग्रुपचे सदस्य निखील पवार, महेश पवार, धनराज सावंत, मुमुर्शी सरपंच संगीता पार्ट, रेवतळे केंद्रप्रमुख सुजितकुमार बनगर, शिक्षणप्रेमी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा, उपाध्यक्षा, सर्व सदस्य, ग्रामस्थांसह सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. पवार यांनी केले.

देवघर रस्ता गायब

। चौल । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील वरंडे-देवघरकडे जाणारा मुख्य रस्ता झाडाझुडुपांमुळे गायब झाला आहे. रस्त्याच्या दुतर्फा झाडे वाढल्यामुळे वाहने चालविणे कठीण झाले आहे. याबाबत नागरिकांमधून सातत्याने आवाज उठविला जात आहे. परंतु, संबंधित विभागाला साफसफाई करण्यासाठी वेळ मिळत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. या रस्त्यावरुन मोठ्या प्रमाणात नागरिकांसह शाळकरी मुलांची ये-जा सुरू असते. अशा वेळी मोठा अपघात झाल्यास त्याला जबाबदार कोण, असा सवाल विचारला जात आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबाग आणि परिसरातील Bsc, Bcom, BA पदवीधर उमेदवारांना Work From Home पद्धतीने कामकाज करण्याची सुवर्णसंधी. त्वरित संपर्क करा. ९४०३२१२१२१
- अलिबाग शहर येथील हॉस्पिटलमध्ये नर्सची आवश्यकता आहे. संपर्क ९८५०३४८५०६, ९८२२४०९८४९.
- रिसॉर्ट भाड्याने देणे आहे. ६ A/c Rooms, किचन हॉल स्विमिंगपुल नारळाची वाडी पार्किंगसह (एकूण क्षेत्र १० गुंठे) संपर्क- ८३२९१७५७९१ ठिकाण आक्षी (रायवाडी)
- अलिबागमध्ये नामांकित टू व्हीलर शोरुममध्ये अनुभवी मॅकेनिक पाहिजे व शोरुममध्ये काम करायला बाई पाहिजे. (संपर्क : ७५१७७०१८५८/९८२२०६३१६६)

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

नेरळमध्ये मंगळवारपासून सटूआई देवीची यात्रा

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात नेरळजवळील कोलीवली येथे असलेल्या सटूआई देवीची यात्रा येत्या ३१ डिसेंबर रोजी आहे. जागृत देवस्थान म्हणून परिचित असलेल्या सटूआई देवीच्या दर्शनासाठी आणि नवस फेडण्यासाठी तीन जिल्ह्यांतून भक्त येत असतात. यावर्षी ही यात्रा ३१ डिसेंबर रोजी येत असल्याने यात्रा आणि थर्टी फर्स्ट एकत्र साजरे होणार आहे.

■ हजारो भाविकांची होणार गर्दी

पौष महिन्याच्या पहिल्या दिवशी सटूआई देवीच्या यात्रेला सुरुवात होते. भक्तगणांमध्ये आनंदाचे वातावरण असते. या सटूआईच्या साक्षात्काराची आणि शक्तीची अनुभूती अनेक भागात पसरली आहे. पूर्वीपासून कोलीवली गावात यात्रा भरत असल्याचे जेष्ठ मंडळी सांगतात. नवसाला पावणारी सटूआई असल्याने कोलीवली गावात देवीच्या दर्शनासाठी कर्जत तालुक्यासह कल्याण, भिवंडी, ठाणे, रायगड, पनवेल, लोणावळा, खंडाळा आदी ठिकाणाहून देवीभक्त येत असतात.

नवजात बाळाचे भविष्य अधोरेखित केले जाते अशी देवी भक्ताची श्रध्दा असल्याने संपूर्ण पौष महिन्यात भक्तांची गर्दी असते. मातेच्या पोटी जन्म घेणाऱ्या प्रत्येक बाळाचे भविष्य सटुआई लिहून ठेवत असते, अशी आख्यायिका असून, त्या बाळाचे भविष्य उज्ज्वल राहावे यासाठी आणि अनेक दाम्पत्य आपल्या संतती सुख मिळावे यासाठी सटुआईला नवस करीत असतात. त्यामुळे घेतलेला नवस फेडण्यासाठी नेरळजवळ कशेळे रस्त्यावर असलेल्या कोलीवली गावातील सटुआईच्या भेटीसाठी भाविक हजारोंच्या संख्येने येत असतात. त्या भाविकांची नवस फेडण्यासाठी गर्दी प्रामुख्याने पौष मासारंभ या दिवशी भरणाऱ्या यात्रेला होत असते. त्यावेळी नवस फेडण्यासाठी आलेले भाविक कोलीवली गावाच्या परिसरात जेवण बनवून खाऊन घरी परततात.

नवस फेडण्यासाठी १५ दिवस

कोलीवली येथील यात्रेत पौष महिन्याचे पहिल्या दिवशी भक्त मोठ्या संख्येने गर्दी करतात. त्यामुळे वाद होण्याचे प्रसंग घडतात आणि त्यामुळे कुटुंबासह येणारे भक्त हे यात्रेला येण्याचे टाळू लागले. आता मागील काही वर्षात यात्रा झाल्यानंतर पुढील १५ दिवस भक्त देवीचा नवस फेडण्यासाठी येत असतात. त्यामुळे १५ दिवस यात्रा चालते आणि त्या काळात व्यापार उदीम वाढण्यासदेखील मदत होते.

साई भंडाऱ्यात भाविकांनी घेतला महाप्रसादाचा लाभ

। नागोठणे । वार्ताहर ।

नागोठण्यातील श्री साई सेवक मित्रमंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला १३ वा नागोठणे ते शिर्डी पदयात्रा पालखी सोहळा दि. २० डिसेंबरला शिर्डी येथे साईबाबांच्या दरबारी पोहोचल्यानंतर या पालखीचे नागोठणे नगरीत २२ डिसेंबरला आगमन झाले. पदयात्रेत सहभागीझालेलेसाईभक्तनागोठणेयेथे परतल्याने साई भक्तांकडून बुधवार, दि. २५ डिसेंबरला सायंकाळी सात वाजता ग्रामदेवता जोगेश्वरी मातेच्या पटांगणात आयोजित केलेल्या साई भंडाऱ्यात नागोठणे शहरातील शेकडो नागरिकांनी व साईभक्तांनी सहभागी होऊन महाप्रसादाचा लाभ घेतला.

(छायाचित्र : महेश पवार)

या पायी साई पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या साईभक्तांचा, पालखी सोहळ्याला सहकार्य करणाऱ्या अनेक देणगीदार व मान्यवरांचा यावेळी शाल व श्रीफळ देऊन श्री साई सेवक मित्रमंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला नागोठण्याचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य डॉ. मिलिंद धात्रक, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर साळुंखे, संतोष नागोठणेकर आदींसह नागरिक व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा साई भंडारा यशस्वी होण्यासाठी श्री साई सेवक मित्रमंडळाचे शंकर भालेकर, मच्छिंद्र साळुंखे, मनोज भोसले, विशाल खंडागळे आदी पदाधिकाऱ्यांसह मंडळाचे सदस्य तसेच पदयात्रेत सहभागी झालेले सर्व साई सेवक यांनी मेहनत घेतली. यावेळी उपस्थित साईभक्तांनी साई सेवक मंडळाच्या कार्याचे कौतुक केले.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

। माथेरान । वार्ताहर ।

सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नवीन वर्षात पदार्पण करताना आपला आनंद लहान मुलांना सोबत घेऊन द्विगुणित करावा याच मुख्य हेतूने प्रेरित होऊन मुंबई येथील अजित शहा, सुरभी शहा, भारती दलाल, मुकेश दलाल या दांपत्यानी येथील नगरपरिषदेच्या वीर हुतात्मा भाई कोतवाल प्राथमिक शाळेला सदिच्छा भेट देऊन सर्व शालेय

विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आणि खाऊचे वाटप केले.

जवळपास १५० पटसंख्या असलेल्या या शाळेत सर्वसामान्य कष्टकरी लोकांची मुले शिक्षण घेत आहेत. त्याचबरोबर तिन्ही अंगणवाडीच्या मुलांनादेखील खाऊचे वाटप करण्यात आले आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक नितीन शहा, शाळेचे मुख्याध्यापक दिलीप आहिरे, शिक्षक लक्ष्मण ढेबे, सचिन भोईर, संतोष चाटसे, अमोल अंधारे, साक्षी कदम, मनिषा चौधरी, किरण शिंदे, पाटील आदी उपस्थित होते.

तळा येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

। तळा । वार्ताहर ।

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा २०२४-२५ चे वार्षिक स्नेहसंमेलन व क्रीडा महोत्सव नुकतेच पार पडले. वार्षिक स्नेहसंमेलनात कला, क्रीडा नाट्य स्वरुपातील विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन संस्थेचे सचिव मंगेश देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव, परीक्षक प्रा. जामदार, प्रा. भवरे, सांस्कृतिक प्रमुख डॉ. भगवान लोखंडे, डॉ. राजाराम थोरात, डॉ. दत्ता कुंटेवाड आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. ज्यामध्ये पोवाडा, कोळीगीत, नाटक, लावणी आदी कार्यक्रम सुंदर पद्धतीने सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. नानासाहेब यादव यांनी केले. उद्घाटनप्रसंगी सचिव मंगेश देशमुख यांनी संस्थेच्या प्रगतीचा आलेख पालकांपर्यंत पोहोचवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. निवेदन डॉ. तृप्ती थोरात व डॉ. भगवान लोखंडे यांनी, तर आभार डॉ. दत्ता कुंटेवाड व डॉ. राजाराम थोरात यांनी मानले. यावेळी संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, पालक, नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संकेत पाटील यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन; हाशिवरे महात्मा गांधी विद्यालयाचे स्नेहसंमेलन

स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी सखोल अभ्यास करा

। खारेपाट । वार्ताहर ।

स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासने सखोल अभ्यास करावा, असे मार्गदर्शन मंत्रालयातील विधी उच्च तंत्रशिक्षण विभागाचे अवर सचिव संकेत पाटील यांनी केले. अलिबाग तालुक्यातील महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय हाशिवरे, वैजाळी इंग्रजी माध्यम शाळा व वैजाळी मराठी माध्यम प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्र मोकल यांचय अध्यक्षतेखाली उद्घाटन सोहळा पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच माजी पंतप्रधान स्वर्गीय डॉ. मनमोहनसिंह यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, आयएसएस, आयपीएस आदी स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी सखोल अभ्यास करावा तसेच जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास, अभ्यासात सातत्य प्रयत्न करणे गरजेचे आहे, त्याचप्रमाणे या परीक्षेत यशस्वी झाल्यानंतर आपल्या गावच्या विकासासाठी सहकार्य करावे. महत्त्वाचे म्हणजे सदर विद्यालयाच्या शैक्षणिक आलेख उल्लेखनीय असून, इयत्ता दहावी-बारावी तसेच शैक्षणिक, कला, क्रीडा, विज्ञान अशा विविध क्षेत्रात विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा व राज्यस्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे, त्याबद्दल संकेत पाटील यांनी सर्व विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व संस्थेचे सर्व पदाधिकारी यांचे मोलाचे कार्य आहे. विशेष म्हणजे, माझ्या वडिलांनी याच विद्यालयात शिक्षण घेतले आहे म्हणूनच मी आज तुमच्यासमोर उभा आहे, असे मत संकेत पाटील यांनी व्यक्त केले.

दरम्यान, संकेत पाटील यांच्यासह साहित्यिक कैलास पिंगळे, दिलीप मोकल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांनी रांगोळी प्रदर्शन, हस्तकला प्रदर्शन यांची पाहणी करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले, तसेच विद्यार्थ्यांप्रमाणे या विद्यालयातील शिक्षकांनीही शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्यामध्ये आदर्श शिक्षक पुरस्कार श्री. शिकारे, शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार लतिका पाटील यांना देण्यात आला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्र मोकल, उपाध्यक्ष सरोज डाकी, सचिव ज्ञानेश्वर मोकल, ॲड. शैलेश मोकल, निशिकांत मोकल, सुबोध मोकल व संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच विद्यालयाचे प्राचार्य बी.डी. गायकवाड, माजी मुख्याध्यापक श्री. कडवे, माजी पर्यवेक्षक ए.डी. पाटील तसेच ऋतुजा पाटील, प्रतिभा पाटील आणि प्रज्ञा धसाडे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना पूरो आणि वर्षा नाईक यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक बी.डी. गायकवाड, सर्व शिक्षक, पालक संस्थेचे पदाधिकारी यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाला राजिप गटशिक्षणाधिकारी श्री. पिंगळा, रेवस केंद्रप्रमुख विनोद पाटील उपस्थित होते.

मधुकर मोकल यांचे निधन

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील चिरनेर येथीलमधुकरसीतारामोकलयांचे नुकतेच ७७ व्या वर्षी निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तिधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक विवाहित मुलगा, तीन विवाहित मुली, सून, जावई, नातवंडे असा आप्तपरिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी रविवार, दि. २९ डिसेंबर रोजी श्रीक्षेत्र चिरनेर खाडी येथे सकाळी ८.३० वाजता होईल. तर उत्तरकार्य विधी मंगळवार, दि. ३१ डिसेंबर रोजी चिरनेर येथील राहत्या घरी दुपारी बारा वाजता होईल. उत्तरकार्यानिमित पाटनोलीचे कीर्तनकार हभप महेश साळुंखे महाराज यांचे कीर्तन होणार असल्याची माहिती संजय मोकल, मोरेश्वर मोकल, अजय मोकल यांनी दिली.

गटारातील पाण्याला दुर्गंधी

टपरीधारकांमध्ये नाराजी

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड समुद्रकिनारी नव्याने बांधण्यात आलेल्या गटारांमधील पाण्याला दुर्गंधीचा वास येत असल्याने टपरीधारकांनी नाराजी दर्शवली आहे. दुर्गंधीमुळे पर्यटक याठिकाणी थांबत नाहीत. परिणामी, याचा फटका टपरीधारकांना बसून त्यांच आर्थिक नुकसान होत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

मुरुड समुद्रकिनारी ठिकाणी पर्यटकांची संख्या वाढावी व यामधुन स्थानिक नागरिकांना रोजगार मिळावा याकरिता मुरुड समुद्रकिनारा सुशोभिकरणाचे काम सुरू आहे. हे काम ही अंतिम टप्प्यात आहे. परंतु याठिकाणी नव्याने बांधलेले गटारे हे डोकेदुखी टपरीधारकांना ठरत आहे. गटारातील पाणी योग्य पध्दतीने निचरा होत नसल्याने पाण्याला दुर्गंधी पसरली आहे. यामुळे येणाऱ्या पर्यटकांना व स्थानिकांना या दुर्गंधीचा सामाना करावा लागत आहे.तसेच या दुर्गंधीमुळे डासांची पैदास दिवसांदिवस वाढत असल्याने याठिकाणी रोगराई पसरू शकते. याधास्तीने पर्यटक याठिकाणी खाण्यासाठी थांबत नसल्यामुळे टपरीधारकांना यांचा आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. तसेच सुशोभिकरणाच्या ठिकाणी सिमेंटच्या धुळीचे साम्राज्य पसरले आहे. हवा आली की ही धूळ खाण्यात, पाण्यात जात असल्याने आर्थिक नुकसान होत आहे. तसेच येणाऱ्या स्थानिक व पर्यटकांना या धुळेच्या कणाचा त्रास होऊ लागला आहे. याचा ठेकेदारांनी विचार करून योग्य तो पावले उचलून सिमेंटच्या धुळीचे साम्राज्य व गटारातील पाण्याचा कसा निचरा होईल याकडे गांभीर्याने लक्ष देऊन गटार साफ केले पाहिजे, तरच याठिकाणी पर्यटक व स्थानिक नागरिक थांबू शकतील.

टपरीधारक अरविंद गायकर यांनी सांगितले की, काम सुरू करण्यापूर्वी आम्हाला विश्वास न घेता या ठिकाणी गटारे बांधण्यात आली. या ठिकाणी गटाराची गरज नसताना या ठिकाणी गटारे बांधण्यात आली. यामुळे आमच्या टपरीधारकांची जागा कमी झाली. जी गटारे बांधली, त्या गटारातून नीटपणे पाण्याचा निचरा होत नसल्याने या ठिकाणी चिखल जमा झाला आहे. आणि यांची दुर्गंधी ठिकाणी पसरत असल्याने याठिकाणी स्थानिक नागरिक व पर्यटक या ठिकाणी खाण्यासाठी व खरेदीसाठी थांबायला मागत नाही. यामुळे सर्वंच टपरीधारकांच्या व्यवसायावर परिणाम होत असल्याने आम्ही स्वतः मुख्याधिकारी यांना भेटून हकीकत सांगण्यात आली. तद्नंतर स्वतः तातडीने मुख्याधिकारी भेट देऊन पाहणी केली; परंतु त्यावर ठोस निर्णय होत नसल्याने आम्ही चार दिवसांपूर्वी पद्मदुर्ग व्यावसायिक कल्याणकारी मंडळाच्या वतीने मुख्याधिकारी यांना यासंदर्भात पुन्हा लेखी निवेदन देण्यात आले आहे.



(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

नेत्र तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

। रसायनी । वार्ताहर ।

मोतिबिंदू मुक्त मोहोपाडा रसायनी अभियानांतर्गत आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल आणि रोटरी क्लब पाताळगंगा यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामपंचायतीच्या शिवांजली इमारतीच्या सभागृहात मोफत नेत्र तपासणी आणि मोतिबिंदू शस्त्रक्रीया शिबिराचे आयोजन शनिवार, दि.२८ रोजी पाच वाजेपर्यंत करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्‌घाटन सरपंच उमा मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष सचिन थोरात, रोटरीयन गणेश काळे, रो. बाळकृष्ण होनावले, रो. गणेश वर्त, रो. विजय पाटील, रो. सुनील भोसले, रो. शानबाग, रो. अमित शहा, माजी सरपंच संदीप मुंढे, सदस्य केदार भोईर, डॉ. विलास पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

या शिबिरात ९० रुग्णांनी मोफत नेत्र तपासणी केली. यात ४० रुग्णांना मोतिबिंदूचा त्रास असल्याचे तपासणीत दिसून आले. शिबीर यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लबचे पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

कलमवाडी झाले ‘स्वप्नातील गाव’

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

तालुक्यातील वझरवाडी ग्रामपंचायत अंतर्गत कलमवाडी हे गाव स्वदेस फाऊंडेशनतर्फे स्वप्नातील गाव जाहीर करण्यात आले.

यासंदर्भात अधिकृत घोषणा गुरूवारी स्वदेसचे संचालक राहुल कटारिया तसेच महाड व पोलादपूर वरिष्ठ व्यवस्थापक मेघना फडके, पोलादपूरचे व्यवस्थापक दिपेश जाधव, वरिष्ठ समन्वयक सुजल अहिरे यांच्यासह तहसीलदार कपिल घोरपडे, सरपंच संभाजी जाधव, गाव विकास समिती अध्यक्ष दशरथ उतेकर, उपाध्यक्षा शीतल जाधव, सचिव वैभव घोलप, संतोष घोलप, शिवाजी जाधव, राजाराम जाधव, शारदा सुतार, सविता सुतार, चंद्रकांत जाधव आणि तुर्भे बुद्रुकच्या सरपंच सुरेखा गोळे, केशव खेडेकर, वासंती पवार, संजना शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आली.

स्वदेस फाऊंडेशनतर्फे घोषणा

याप्रसंगी प्रास्ताविकामध्ये मनिष शिंदे यांनी कलमवाडी गाव स्वच्छ, सुंदर, स्वास्थ्य, सक्षम, साक्षर या पाच सूत्रांवर काम सुरू करून स्वप्नातील गाव होण्यासाठी येणारे अडथळे व त्यावर कशी मात केली याबाबत इत्यंभूत माहिती देताना मागील तीन वर्षांपासून शासन आणि स्वदेस समन्वयामधून १ कोटी १७ लाख ४ हजारांचा निधी खर्च झाल्याचे सांगितले. याप्रसंगी तहसीलदार कपिल घोरपडे यांच्याहस्ते गाव विकास समितीचे अध्यक्ष दशरथ उतेकर यांचा सत्कार करण्यात आला.

पोलादपूरचे व्यवस्थापक दिपेश जाधव यांनी, गाव विकास समितीचे अध्यक्ष दशरथ उतेकर यांच्या प्रयत्नांतून क्राऊड फंडींग जमा करण्यात येऊन या निधीच्या माध्यमातून कामे करण्यात आली.

प्रांजल पाटील संगीतरत्न पुरस्कार

। चिरनेर । प्रतिनिधी ।

उरण तालुक्यातील मोठे भोम गावातील श्री महागणपती रिक्षा चालक युनियनचे सदस्य हरेश रामचंद्र पाटील यांची इयत्ता दहावी शिकणारी कन्या गायिका प्रांजल पाटील ही पारस काव्य कला जनजागृती संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय संगीतरत्न पुरस्कार २०२४ ची मानकरी ठरली असून, तिला हा मानाचा पुरस्कार शनिवारी (दि. २८) नवी मुंबई येथील बाबासाहेब आंबेडकर भवन येथे आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे.

घराण्याला कोणतीही गायनाची परंपरा नसतानादेखील, गायनाचा छंद जोपासणाऱ्या प्रांजल पाटील हिने आजपर्यंत ३० पेक्षा जास्त गाण्यांचे रेकॉर्डिंग पूर्ण केलेले आहेत. हळदीच्या कार्यक्रमाबरोबर गौरी-गणपती, नवरात्र उत्सव अशा विविध कार्यक्रमांतून तिचे गायनाचे कार्यक्रम सुरू आहेत. भजनाची आवड असल्यामुळे सध्या ती शास्त्रीय गायनाचे धडे घेत आहेत. दरम्यान, सध्या दि.बा. पाटलांच्या जीवनावरील तिचं गाणं रायगड जिल्ह्यात गाजत असून, भविष्यात यशस्वी गायिका म्हणून ती निश्चित नावारूपाला येईल, असा विश्वास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मंगेश चांदिवडे व जागतिक कीर्तीचे कवी पुंडलिक म्हात्रे यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

‘सखी’ने दिले विद्यार्थिनींना स्वास्थ्याचे धडे

नेरळमध्ये मार्गदर्शन शिबीर

। नेरळ । प्रतिनिधी ।

विद्यार्थ्यांना मानसिक आणि शारीरिक आधार देण्यासाठी स्वास्थ्य महत्त्वाचे असून, विद्या विकास मंदिर शाळेतील विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शन डॉ. अर्चना शिरसाट यांनी केले. विद्यार्थ्यांसाठी सखी सावित्री समिती स्थापन झाली असून, विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या समस्यांवर मार्ग दाखवण्यासाठी मार्गदर्शन शिबिरे आयोजित करीत आहे.

विद्या विकास मंदिर शाळेत सखी सावित्री समितीच्यावतीने विद्यार्थिनींसाठी मार्गदर्शन शिबीर आयोजित केले होते. त्यावेळी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. अर्चना शिरसाट यांच्यासह सगुणाबाग कृषी पर्यटन केंद्राच्या प्रा. अनुराधा भडसावळे या समुपदेशक म्हणून, तर शाळेच्या प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका विनया काकडे आदी उपस्थित होत्या. समितीच्या या दोन्ही सदस्या असलेल्या भडसावळे आणि डॉ. शिरसाट यांनी वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन केले. प्रा. भडसावळे यांनी अनुराधा चंद्रशेखर भडसावळे यांनी बदलत्या काळानुसार मुलींनी समाजात वावरताना स्वतःची काळजी कशी घ्यावी, मानसिक आरोग्य उत्तम राहण्यासाठी आपल्यात काय बदल करणे आवश्यक आहे, याबाबत मार्गदर्शन केले.

डॉ. अर्चना शिरसाट यांनी विद्यार्थ्यांना योग्य आहार कसा असावा, आरोग्याची कशी काळजी घ्यावी, याबद्दल मार्गदर्शन केले. त्यावेळी विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणीदेखील केली. अशाप्रकारे विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य आणि शारीरिक स्वास्थ्य टिकविण्यासाठी शाळेनेदेखील पुढाकार घ्यावा, अशी सूचना डॉ. शिरसाट यांनी केली.

विद्यार्थिनींना मेन्स्ट्रूअल कप वितरण

। पोलादपूर । प्रतिनिधी ।

तालुक्यातील धैर्य सामाजिक संस्थेच्या माध्यमातून रायगड शिक्षण प्रसारक मंडळ संचलित नरवीर तानाजी मालुसरे माध्यमिक शाळा, देवळे येथील कुमारिका विद्यार्थिनी, शिक्षिका आणि शिक्षकेतर महिला कर्मचाऱ्यांना मासिक पाळीच्या कपचे म्हणजेच मेन्स्ट्रूअल कपचे वाटप करण्यात आले.

महिला आरोग्य विषयक कार्यक्रमासाठी धैर्य सामाजिक संस्थेच्या सदस्या तृप्ती ओंकार उतेकर, सहशिक्षिका गीता अनंत गोळे, मुख्याध्यापक पिंगळा उपस्थित होते. मासिक पाळीमध्ये मेन्स्ट्रूअल कप का वापरावा, कसा वापरावा, त्याचे फायदे याबाबत इत्यंभूत माहिती संस्थेच्या सदस्या तृप्ती उतेकर यांनी विद्यार्थिनींना दिली.

विद्यार्थिनींना मासिक पाळीतील स्वच्छतेसाठी मासिक कप वितरण कार्यक्रमासाठी कोप्रान फार्मा कंपनीने सहकार्य केले. या कार्यक्रमाचे आयोजन स्वराज सेवा वाघमोडे प्रतिष्ठान यांनी केल्याबद्दल शाळा व्यवस्थापन समितीच्या आणि शाळेच्यावतीने मुख्याध्यापक पिंगळा यांनी यांचे मन:पूर्वक आभार मानले.

धैर्य सामाजिक संस्थेच्या प्रयत्नातून युवतींच्या आरोग्य, स्वच्छता आणि आत्मविश्वासासाठी टाकलेले हे महत्त्वाचे उपक्रम स्वरूपातील पाऊल असल्याचे सहशिक्षिका गीता गोळे यांनी सांगितले.

धैर्य संस्थेची सामाजिक बांधिलकी

राष्ट्रीय सेवा योजनाच्या निवासी शिबिराचा समारोप

। शिहू । वार्ताहर ।

येथील कोकण एज्युकेशन सोसायटीच्या आनंदीबाई प्रधान विज्ञान महाविद्यालयाच्या, राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजीत निवासी श्रमसंस्कार शिबिराचा समारोप रा.से. यो. जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. तुळसीदास मोकल, डॉ. सी. डी. देशमुख महाविद्यालय, रोहा यांच्या प्रमुख उपस्थितीत व प्र. प्राचार्य डॉ. दिनेश भगत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

याप्रसंगी वेलशेत-आंबेघर येथील माजी सरपंच संतोष कोळी हे उपस्थित होते. प्रा. मोकल सरांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी शिबिरात लागलेल्या चांगल्या सवयी आत्मसात कराव्यात जेणेकरून तुम्हाला आयुष्य चांगले जगता येईल. प्रमुख पाहुणे व माजी सरपंच संतोष कोळी यांनी, गेली तीन वर्षे रा.से.यो. विभाग प्लास्टिक मुक्त पिगोंडे गाव होण्यासाठी योगदान देत असल्याने कार्यक्रम अधिकारी व शिबारार्थी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच पथनाट्य सादरीकरणातील विद्यार्थ्यांना रकमेच्या स्वरुपात बक्षीस दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अहवाल वाचन कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. श्रीकृष्ण तुपारे यांनी केले. बक्षिसांचे वाचन कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोहर शिरसाठ यांनी केले. या शिबिरात पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी, जयवंत गायकवाड, प्राचार्य डॉ. संदेश गुरव, महेश गोसावी, प्रा.डॉ. विलास जाधवर, प्रा. नीलम महाले, प्रा.डॉ. राणी ठाकरे, प्रा. हेमंत जाधव यांनी मार्गदर्शन केले. या समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पायल गदमले हिने केले, तर आभार प्रदर्शन भार्गव यशपाटील यांनी केले. हे शिबीर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्राचार्य डॉ. दिनेश भगत यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. श्रीकृष्ण तुपारे, डॉ. मनोहर शिरसाठ, नंदकुमार बावकर, सुमित घासे, सारिका घासे, आयुष ताडकर यांसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व ग्रामस्थांनी मेहनत घेतली.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक श्री. प्रकाश केसरीनाथ जोशी यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

मौजे- कामतपाडा, तालुका-कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत

सर्वे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे. आर. पॉ.	आकार रू. पै.
५९	७ /अ	०.२०.००	०.१५

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत ही तद्‌ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खाली सही खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि.३०/१२/२०२४

खरेदीदारातर्फे वकील
ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो.८१४९२११३६६/७७०९१६०५६७

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक सौ. सरीता अनंता कराळे उर्फ सरीता मारूती रूठे कडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी नमुद मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

मौजे - बिड बुद्रुक, तालुका - कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत

गावाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे. आर. पॉ.	आकार रू. पै.
मौजे बिड बुद्रुक	१४	३/च	०.०७.१०	०.०९

सदरची जमीन मिळकत ही वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकत या तद्‌ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्जलिन वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून २१ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : कर्जत
दि.३०/१२/२०२४

खरेदीदारातर्फे वकील
ॲड. लक्ष्मण धर्मराज जाधव
पत्ता. मार्वल क्षिप्रा रेसीडेन्सी, शॉप नं. २४,
डी विंग, मुद्रे बुद्रक, ता. कर्जत, जि. रायगड
मो.८१४९२११३६६/७७०९१६०५६७

वावोशीत महिला बचत गटांसाठी मत्स्य प्रशिक्षण

केंद्रीय मात्स्यिकी प्रौद्योगिकी रिसर्च संशोधन केंद्राचा उपक्रम

। वावोशी । वार्ताहर ।

खालापूर तालुक्यातील भिमनगर, वावोशी गावात केंद्रीय मात्स्यिकी प्रौद्योगिक संशोधन केंद्राकडून दि. १९ ते २१ डिसेंबर या कालावधीदरम्यान अनुसूचित जाती समुदायासाठी तीन दिवसीय विशेष प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मत्स्योत्पादन व प्रक्रिया तंत्रज्ञानाच्या माध्यमातून स्थानिक समुदायांना सक्षम करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे आयोजन केंद्रीय मात्स्यिकी प्रौद्योगिक संशोधन विभाग कोचीचे संचालक डॉ. जॉर्ज निनन, एससीएसपीचे नोडल ऑफिसर डॉ. ए. सुरेश, आणि नवी मुंबईच्या वैज्ञानिक प्रमुख डॉ. आशा के. के यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. अभय कुमार यांनी मत्स्योत्पादनाच्या तत्त्वांवर आणि मासे आरोग्य व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणादरम्यान महीला व शेतकऱ्यांना मासे स्वच्छता, कटिंग, फिलेट तयार करणे, बर्फ साठवणूक, तसेच फिश बॉल्स, फिश फिंगर्स, बटरफ्लाय श्रिंप यांसारख्या मूल्यवर्धित उत्पादनांची तयारी शिकवण्यात आली. तसेच प्रादेशिक आवडींनुसार उत्पादने विकसित करण्याचे प्रशिक्षणही देण्यात आले.

रायगड जिल्ह्यातील पंचशील महिला बचत गट , रमाई महिला बचत गट व संविधान महिला बचत गटातील ३० सदस्यांना या कार्यक्रमाचा लाभ मिळाला. या प्रशिक्षणादरम्यान शेतकरी व महिला बचत गटाला सरपंच आश्विनी शहासने, वैज्ञानिक डॉ. आशा के. के, अभय सर यांच्या हस्ते मासे प्रक्रिया यंत्रसामग्री वितरित करण्यात आली, यामध्ये बर्फ बॉक्स, कापण्याचे यंत्र, सीलिंग मशीन, प्रेशर कुकर, गॅस स्टोव्ह, वजन काटा, मिक्सर, आणि इतर उपयुक्त साधनांचा समावेश होता. यावेळी या कार्यक्रमाला केंद्रीय मात्स्यिकी प्रौद्योगिक संशोधन केंद्र नवी मुंबईच्या वैज्ञानिक प्रमुख डॉ. आशा के. के, डॉ अभयकुमार, प्रियांका नकवा, तुकाराम वाघमारे, सुप्रिया चौताळे, सूरज पाटील, आणि अनिकेत कांबळे यांसारखे अधिकारी उपस्थित होते.

> या उपक्रमामुळे अनुसूचित जाती समुदायाला नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक सक्षम होण्याची संधी मिळाली आहे. मत्स्योत्पादन व प्रक्रिया तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्याच्या दिशेने खउअठ–उखत्रऋ संशोधन केंद्राने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.
>
> – डॉ. अभय कुमार, वैज्ञानिक, अनुसंधान केंद्र, नवी मुंबई

> या कार्यक्रमामुळे महिला बचत गट व शेतकऱ्यांना लघु अन्न व्यवसाय सुरु करण्याची संधी मिळाली असून, त्यांचा स्थानिक जीवनमान सुधारण्यासाठी महत्त्वाची भूमिका आहे. आर्थिक विकास गतिमान होण्यास खूप मोठी मदत होईल, असा आम्हाला विश्वास आहे.
>
> – अश्विनी मोरे, समुदाय संसाधन प्रमुख, वावोशी विभाग

e-TENDER NOTICE –

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

RFX	Description	Esti. Cost
Tend-52/24-25 7000034185 2nd call	Supply of testing tools at various substations under EHV (O&M) Dn Dombivali. **Tender Fee Rs. 500/- +GST**	**Rs. 11.40 Lakhs**
Tend-57/24-25 7000034126 2nd call	Work of chemical resistant coating of ICT at 220kV Apta, 220kV Taloja & 100kV Thal substation, under EHV (O&M) Dn. Panvel under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 500/- +GST**	**Rs. 32.50 Lakhs**

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 27.12.2024 to 08.01.2025 up to 11:00 hrs, Opening date:- 08.01.2025 @ 11:30 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID se7200@mahatransco.in

Sd/-
SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL

यजमान सांगलीची विजयी सलामी

राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

। सांगली । प्रतिनिधी ।
महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने व युवक मराठा मंडळाच्या सहकार्याने सांगली जिल्हा कबड्डी असोसिएशन तर्फे सांगलीतील सांगलवाडी येथील चिंचबाग मैदानावर ५१ व्या कुमारी गट राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत. या स्पर्धेत यजमान सांगलीसह पिंपरी-चिंचवड, पुणे ग्रामीण, मुंबई शहर पूर्व आणि पश्चिम, सोलापूर, अहमदनगर, उपनगर पूर्व व रायगड या संघानी विजयी सलामी दिली आहे.

या स्पर्धेत 'फ' गटातील सामन्यात यजमान सांगलीने बीडचा ८२-११ असा धुव्वा उडवीत पहिल्या साखळी विजयाची नोंद केली आहे. पूर्वार्धात २ लोण देत ३५-०६ अशी आघाडी घेणाऱ्या सांगलीने उत्तरार्धात धुव्वादार खेळ करीत आणखी ४ लोण देत गुणांचे पाऊण शतक पार केले. याच गटात मुंबई शहर पूर्वने उस्मानाबादचा ६३-२५ असा पराभव केला. पूर्वार्धात २ लोण देत ३२-१७ अशी आघाडी घेणाऱ्या मुंबईने उत्तरार्धात आणखी ३ लोण देत हा मोठा विजय साकारला.

'अ' गटात गतविजेत्या पिंपरी-चिंचवडने पालघरला ४०-३०असे नमविले. विश्रांतीला २०-१२ अशी आघाडी घेणाऱ्या पिंपरी-चिंचवडने नंतरही त्याच जोमाने खेळत विजय साकारला. 'ब' गटात पुणे ग्रामीणने पुणे शहरचा कडवा प्रतिकार ३५-३२ असा मोडून काढत पहिला विजय नोंदविला. पहिल्या डावात १२-१७ अशा पिछाडीवर पडलेल्या पुणे ग्रामीणने ही किमया केली. 'क' गटात मुंबई उपनगर पूर्वने जळगावला ५४-३० असे रोखले. उपनगरने आक्रमक सुरुवात करीत मध्यांतरापर्यंत २ लोण देत ३५-१३ अशी मोठी आघाडी घेतली. नंतर सावध खेळ करीत आघाडी टीकविण्यावर भर देत विजय साकारला.

'इ' गटात मुंबई शहर पश्चिमने रत्नागिरीचे कडवे आव्हान ३४-३३ असे परतवून लावत पहिला साखळी विजय प्राप्त केला. पहिल्या डावात ११-१७ अशा पिछाडीवर पडलेल्या मुंबईने सामन्याच्या शेवटच्या क्षणाला गुण घेत ही किमया केली. याच गटात परभणीने नांदेडला ८०-२० असे धुवून काढले. पूर्ण डावात ७ लोणची नोंद करीत परभणीने गुणांचे पाऊण शतक पार केले. याच 'इ' गटात नंदुरबारने मुंबई उपनगर पश्चिमला ४०-२८ असे पराभूत करीत कबड्डी रसिकांना आश्चर्याचा धक्का दिला. पहिल्या डावात सावध खेळ करीत १७-१४ अशी आघाडी घेणाऱ्या नंदुरबार ने उत्तरार्धात जोषपूर्ण खेळ करीत १२ गुणांच्या फरकाने सामना खिशात टाकला.

इतर निकाल:-

'ब' गट १. सोलापूर वि. औरंगाबाद ५५-३६, २. पुणे शहर वि. औरंगाबाद ६७-२६, ३. पुणे ग्रामीण वि. सोलापूर ५१-२४, 'क' गट १. जालना वि. ठाणे ग्रामिण ४७-१७, २. मुंबई उपनगर पूर्व वि. ठाणे ग्रामीण २१-१८, 'ग' गट १. रायगड वि. लातूर ५५-२०, २. अहमदनगर वि. सातारा ३८-१९, 'ड' गट १. नाशिक ग्रामीण वि. कोल्हापूर ३१-२४, २. धुळे वि. हिंगोली ४९-२५, 'ह' गट ठाणे शहर वि. सिंधुदुर्ग ५०-१४.

काळभैरव तालीमचा नेत्रदीपक खेळ

। खारेपाट । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील वाडगाव येथे अलिबाग तालुका कुस्तिगीर संस्था व जय हनुमान तालीम संघ वाडगावं यांच्या संयुक्त विद्यमाने तालुका अजिंक्यपद निवड चाचणी कुस्ती स्पर्धा बुधवारी (दि.२५) वाडगाव येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत प्रमोद मनोहर भगत यांच्या मार्गदर्शनातून घडलेल्या पैलवानांच्या श्री काळभैरव तालीम संघाने नेत्रदिपक खेळाचे प्रदर्शन करून उपस्थितांची मने जिंकली आहेत. यावेळी श्री काळभैरव तालीम संघातील यशस्वी पैलवानांना मान्यवरांच्या हस्ते प्रशस्ती पत्रक व पदक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेमध्ये आवासच्या श्री काळभैरव तालीम संघातील खेळाडूंची रायगड जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कुस्ती स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. श्री काळभैरव तालीम संघ आवासचे प्रशिक्षक प्रमोद भगत व सर्व यशस्वी पैलवानांवर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

प्रथम क्रमांकाचे मानकरी

हौशी गट मुली- समीक्षा पाटील (३६ किलो) व मीरा पाटील (३९ किलो). हौशी गट मुले- पवन मांजी (३८ किलो). सब जुनियर गट मुले- निशाल कुमार मांजी (५१ किलो) व प्रणव म्हात्रे (९२ किलो). महिला वरिष्ठ गट- युक्ता मढवी (५३ किलो) व मनीषा गुरूम (६२ किलो). केसरी महिला गट- सुरक्षा थळे (६५ ते ७६ किलो). वरिष्ठ गट पुरुष माती विभाग- शुभम म्हात्रे (८६ किलो) व अंश धोंडसेकर (९७ किलो).

अलिबाग अकॅडमीचा दणदणीत विजय

। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।

आरडीसीए सदस्य समीर मसुरकर पुरस्कृत रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्यावतीने कॅम्पोलियन क्लब टी-२० जिल्हा निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचा अंतिम सामना पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर संपन्न झाला. या स्पर्धेत अलिबाग क्रिकेट अकॅडमी संघाने पेण स्पोर्ट्स असोसिएशन संघावर ६ गडी राखून झणझणीत विजय मिळवला आहे.

पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर खेळलेल्या अंतिम सामन्यात अलिबाग क्रिकेट अकॅडमी संघाने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेतररक्षण स्विकारले होते. प्रथम फलंदाजी करताना पेण स्पोर्ट्स असो. संघाने २० षटकांच्या समाप्तीनंतर ५ गडी गमावत १५३ धावसंख्या उभारली होती. सुरवातीचे फलंदाज झटपट बाद झाल्याच्या नंतर मधल्या फळीत रवी सोलंकी यांनी धुवांधार फलंदाजी करत ५७ तर दुसऱ्या बाजूने समीर आवस्कर यांनी ५३ धावा काढून संघाची धावसंख्या १५३ पर्यंत पोचवली. अलिबाग संघाकडून अभिषेक नाईक २ रितेश तिवारी, मिहिर भाटकर यांनी प्रत्येकी १ फलंदाज बाद केला.

१५४ धावसंख्येचा पाठलाग करताना अलिबाग क्रिकेट अकॅडमी संघाने संयमी फलंदाजी करत सलामीवीर अभिजीत रोहांदिया ३९ व मिहिर भाटकर यांनी ३२ धावांचे योगदान दिले. मधल्या फळीत अलिबागचा युवा तंत्रशुद्ध फलंदाज हृषिकेश राऊत यांनी चौफेर टोलेबाजी करत नाबाद ४५ धावा ठोकल्या त्याला चैतन्य पाटील यांनी दुसऱ्या बाजूने नाबाद १२ धावांची खेळी करत साथ दिली. अलिबाग संघाने सामना शेवटच्या षटकात ६ गडी राखून जिंकला. पेण स्पोर्ट्सकडून सिद्धार्थ म्हात्रे यांनी २ तर तुषार म्हात्रे यांनी एक गडी बाद केला.

अंतिम सामन्यासाठी प्रमूख अतिथी म्हणून रायगड जिल्हा क्रिकेट असो.चे उपाध्यक्ष राजेश पाटील, सदस्य ॲड. पंकज पंडित, मुख्य प्रशिक्षक शंकर दळवी, रायगडचे माजी कर्णधार रविंद्र तांडेल, उदय गद्रे, डॉ. राजाराम हलवांन, पंच चंद्रकांत म्हात्रे, सुयोग चौधरी, आदेश नाईक, सुनील सरगर यांच्यासह दोन्ही संघाचे खेळाडू व क्रिकेट प्रेमी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील खेळाडुंची देदीप्यमान कामगिरी

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

वरिष्ठ व कनिष्ठ वयोगटातील जागतिक पिंच्याक सिलॅट स्पर्धा नुकत्याच दुबई व अबूधाबी येथे पार पडल्या. या स्पर्धे साठी ५७ देशातून १,१०० खेळाडू सहभागी झाले होते. उल्लेखनीय म्हणजे या स्पर्धेत भारतातील विविध वयोगटांमधून १२० खेळाडू सहभागी झाले होते. त्यातही महाराष्ट्रातील १५ खेळाडूंची निवड झालेली होती. त्यांनी देदीप्यमान कामगिरी करत ३ रजत व ९ कांस्यपदके पटकावून भारताचे व महाराष्ट्राचे नाव जागतिक स्तरावर उंचावले आहे.

या स्पर्धेत इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे अध्यक्ष किशोर येवले यांनी जागितक पिंच्याक सिलॅट स्पर्धेत अवघ्या १३ वर्षाच्या पदार्पणानंतर रजतपदक पटकावून इतिहास रचला आहे. तसेच, त्यांनी क्रीडा क्षेत्रात खेळाडूंना नवीन मार्ग दाखवून खेळाडूंमधील उच्च दर्जाचा खेळ खेळण्यास उत्साह निर्माण केला आहे. या विक्रमी नोंदीमुळे क्रीडा क्षेत्राला एक वेगळा दृष्टिकोन मिळाला आहे.

या स्पर्धेत किशोर येवलेंसह हर्षवर्धन भोसले व प्रथमेश दातीर यांनी रजतपदक तर, शिवतेज पाटील, अर्णव गवई, रामचंद्र बदक, सोमनाथ सोनवणे, कृष्णा पांचाळ, पियुष शुक्ला, रिया चव्हाण, प्राजक्ता जाधव, भक्ती किल्लेदार यांनी कांस्यपदक पटकावले आहे.

मुंबई जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी

तीन संघांची दुसऱ्या फेरीत धडक

। मुंबई । प्रतिनिधी

मुंबई शहर कबड्डी असो. आयोजित जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिराच्या पटांगणावर पार पडत आहेत. या स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलांच्या गटात जे.के. स्पोर्ट्स, वीर नेताजी व यश क्रीडा यांनी दुसरी फेरी गाठली आहे.

या स्पर्धेतील मुलांच्या सामन्यात जे.के. स्पोर्ट्सने मध्यांतरातील २१-२८ अशा पिछाडीवरून रामसेवक मंडळाचे कडवे आव्हान ४९-४७ असे परतवित आगेकूच केली. दुसऱ्या सामन्यात वीर नेताजीने चुरशीच्या लढतीत एफर्ड्स युनायटेडचा प्रतिकार ६०-५१ असा मोडून काढला. विश्रांतीला वीर नेताजी २७-२९असा २ गुणांनी पिछाडीवर होता. तिसऱ्या सामन्यात यश क्रीडाने शिवशक्तीला ४४-२५ असे पराभूत केले. पूर्वार्धात २५-०५ अशी आघाडी घेणाऱ्या यश संघाने उत्तरार्धात सावध खेळ करीत विजय मिळविला.

अन्य सामन्यांचा निकाल:- गोलफादेवी वि. ओम त्रिशूल ६०-३१, न्यू परशुराम वि. जय दत्तगुरु ४८-२१, रण झुंजार वि. कस्तुरबा गांधीनगर ५२-२७, विजय बजरंग व्यायाम शाळा वि. वीर नेताजी ६१-४५, समर्थ स्पोर्ट्स वि. श्रीमंत योगी ४०-२१.

माथेरानच्या क्रीडा संकुलाची दुरावस्था

। माथेरान । वार्ताहर ।



माथेरानचे वीर हुतात्मा भाई कोतवाल क्रीडा संकुल हे जिल्ह्यातील सर्वात मोठे क्रीडा मैदान म्हणून प्रसिद्ध आहे. या मैदानावर जानेवारीपासून मार्च महिन्यापर्यंत टेनिस बॉल क्रिकेट सामने आयोजित करण्यात येतात. तर, मे महिन्यात अश्व शर्यतीचे आयोजन करण्यात येते. क्रिकेटचे सामने पाहण्यासाठी येथे प्रेक्षकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी असते. परंतु, या क्रीडा संकुलाची दयनीय अवस्था झाली असून पेक्षकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

माथेरानचे वीर हुतात्मा भाई कोतवाल क्रीडा संकुलाची जवळपास २५ एकरांमध्ये व्याप्ती आहे. याच मैदानाच्या सुशोभीकरण आणि दुरुस्तीसाठी मागील काळात जवळजवळ ५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु, अयोग्य नियोजनामुळे या मैदानाच्या विकास कामांचा पुरता बोजवारा उडाला आहे. स्टेडियम मधील शेडचे पत्रे गायब झालेले असून उन्हाळ्यात प्रेक्षकांना झाडांचा आधार घ्यावा लागत आहे. तसेच, जांभ्या दगडांचा अनाठायी वापर करून एकप्रकारे या मैदानाला बकालपणा आणलेला असल्याने हे मैदान पूर्णपणे विद्रुप झाले आहे. याबाबत ठोस उपाययोजना करावी, अशी समस्त क्रीडाप्रेमींमधून मागणी केली जात आहे.

नाईट अंडरआर्म बॉक्स क्रिकेट स्पर्धा

निनाद स्पोर्ट्सने मारली बाजी

। अलिबाग । संतोष राऊळ ।
चौल बॉक्स क्रिकेट असो. च्या मान्यतेने, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील उर्फ चिऊताई यांच्या सहकार्याने व जिजामाता जान्हवी तळे चौल तर्फे नाईट अंडरआर्म बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे आयोजन शनिवारी (दि.२८) चौल जान्हवी तळे येथील पटांगणावर करण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण १६ संघांनी सहभाग घेतला होता. तर, चुरशीच्या अंतिम सामन्यात आग्रावच्या निनाद स्पोर्ट्स संघाने भोवाळेच्या दत्तकृपा संघाला नमवत बाजी मारली आहे.

स्पर्धेदरम्यान, शेकाप युवा नेते सचिन राऊळ, अभिजित वाळंज, नितीन सारंग, हेमंत पाटील तसेच शिवसेना ठाकरे गटाचे सावस्कर म्हात्रे यांची विशेष उपस्थिती लाभली. स्पर्धेतील अंतिम सामन्यावेळी अभिजीत वाळंज यांच्या हस्ते नाणेफेक करण्यात आली. यावेळी भोवाळेच्या दत्तकृपा संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. आग्रावच्या निनाद स्पोर्ट्स संघाने प्रथम फलंदाजी करताना मर्यादित ३ षटकांत १९ धावा करत भोवाळेच्या दत्तकृपा संघासमोर २० धावांचे आव्हान ठेवले होते.

या अंतिम सामन्यात शेवटच्या चेंडूपर्यंत चुरस वाढली होती. या आधी आग्रावच्या निनाद स्पोर्ट्सने संपुर्ण स्पर्धेत आपले वर्चस्व राखले होते. त्यामुळे तेच जिंकतील अशी आशा सर्वांना लागून होती. अंतिम सामन्यातील तिसरे षटक आग्रावच्या शैलेश पाटील याने टाकले. त्याच्या शेवटच्या चेंडूवर दत्तकृपाला जिंकण्यासाठी २ धावांची गरज होती. मात्र, शैलेश पाटील याने कुशलतेने टाकलेल्या या चेंडूवर दत्तकृपाला फक्त एकच धाव काढता आली. आणि आग्रावच्या निनाद स्पोर्ट्सने अंतिम सामन्यात बाजी मारली. त्यामुळे, भोवाळेच्या दत्तकृपा संघाला दुसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले.

तसेच, या स्पर्धेत जय हनुमान पाडा चौल व सिद्धीविनायक बीबी चौल यांना अनुक्रमे तिसऱ्या व चौथ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले आहे. विजयी संघांना रोख रक्कम व आकर्षक चषक राजू खराडे, प्रकाश म्हात्रे, प्रकाश शेणवईकर व राजेंद्र वर्तक यांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेतील सामनावीर म्हणून आग्रावच्या शैलेश पाटील याला विनय म्हात्रे मित्र मंडळाकडून बक्षिस स्वरूपात सायकल देऊन सन्मानित करण्यात आले. तर, स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी जिजामाता जान्हवी तळे संघाचे केतन म्हात्रे, रीतेश वर्तक, प्रसाद पाटील, शुभम पाटील, रोहन म्हात्रे, अक्षय शेणवईकर, निकेत शिंदे, ओमकार खारकर, चेतन सरदार, रूपेश खारकर, स्वराज पाटील व आर्यन वर्तक यांनी विशेष मेहनत घेतली.

खडकोली शाळेचे यश

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यातील ना.म. जोशी विद्याभवन गोरेगाव येथे तालुकास्तरीय सांस्कृतिक स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत खडकोली शाळेने विविध या सांस्कृतिक स्पर्धेत यश संपादन करून शाळेचे व गावाचे नाव उंचावले आहे.

यावेळी, खडकोली शाळेने मोठ्या गटात पारंपारिक नृत्य प्रकारात प्रथम क्रमांक, माती शिल्प प्रकारात सोहम सुतार याने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तर, लहान गटात पारंपारिक नृत्य प्रकारात द्वितीय क्रमांक, समूहगीत प्रकारात द्वितीय क्रमांक तर, पथनाट्य प्रकारात तृतीय क्रमांक पटकावला आहे.

तसेच, मोठ्या गटातील पारंपारिक नृत्य प्रकारात प्रथम क्रमांक प्राप्त केलेले नृत्य जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र झालेले आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे माणगाव गटशिक्षणाधिकारी तांबट, गोरेगांव बीट विस्तार अधिकारी खामकर व केंद्रप्रमुख साळवी यांनी अभिनंदन केले आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, आँर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)